नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक ३५ * * अमरावती * मंगळवार, दिनांक ५ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बनावट चकमक : ३२ वर्षांनंतर शिक्षा

■ वृत्तसंस्था, मोहाली, दि. ४ :
पंजाबमधील तरनतारन येथे १९९३ च्या बनावट चकमक प्रकरणात सीबीआयच्या विशेष न्यायालयाने सोमवारी शिक्षा सुनावली. न्यायालयाने निवृत्त एसएसपी भूपेंद्रजीत सिंग, डीएसपी दविंदर सिंग, इन्स्पेक्टर सुबा सिंग, एएसआय गुलबर्ग सिंग आणि एएसआय रघबीर सिंग यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

या सर्वांवर ७ जणांच्या हत्येचा आणि गुन्हेगारी कट रचल्याबद्दल आयपीसीच्या कलम ३०२ आणि १२०-ब अंतर्गत खटला चालवण्यात आला. सुरुवातीला या प्रकरणात १० पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आरोपी बनवण्यात आले होते, परंतु त्यापैकी ५ जणांचा खटल्यादरम्यान मृत्यू झाला.

### ओबीसी आरक्षणासह होणार महापालिका निवडणुका
# सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :
सर्वोच्च न्यायालयाने नव्या प्रभाग (वॉर्ड) रचनेला आणि ओबीसी आरक्षणाला आव्हान देणाऱ्या सर्व याचिका फेटाळून लावत, निवडणुकांना मंजुरी दिली आहे.

त्यामुळे आता संपूर्ण राज्यभरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नव्या प्रभाग रचनेनुसार आणि २७ टक्के ओबीसी आरक्षणासह होणार हे निश्चित झाले आहे. त्यामुळे महापालिका, नगरपालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

नव्या प्रभाग रचनेला आव्हान देणाऱ्या विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या होत्या. काही स्थानिक घटकांनी नव्या रचनेतील बदलांवर आक्षेप घेतले होते.

मात्र, आज न्यायालयाने या याचिका फेटाळत राज्य सरकारच्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. त्यामुळे मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये नव्या प्रभाग बांधणीच्या आधारे निवडणुका घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

लातूर जिल्ह्यातील औसा नगरपालिकेच्या निवडणुकी संदर्भात एक याचिका सुप्रीम कोर्टात दाखल करण्यात आली होती. याचिकेत ११ मार्च १०२० पूर्वीच्या वॉर्ड रचनेनुसार निवडणूक घेण्याची मागणी करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी झाली असून, सुप्रीम कोर्टाने ती फेटाळून लावली.

ही निवडणूक सुद्धा नवीन वॉर्ड रचनेप्रमाणे घेण्यात यावी, असे निवडणूक आयोगाने अधिसूचित केले होते. त्यामुळे आजच्या आदेशाप्रमाणे नवीन वॉर्ड/प्रभाग रचनेनुसार निवडणुका होतील, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

**२७ टक्के ओबीसी आरक्षणासह होणार निवडणुका**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ओबीसी आरक्षणाला आव्हान देणारी याचिका देखील सुप्रीम कोर्टाने आज फेटाळून लावली. या याचिकेच्या सुनावणीवेळी सुप्रीम कोर्टाने सांगितले की, आमच्या ६ मे २०२५ च्या आदेशानुसार २७% ओबीसी आरक्षणानुसारच निवडणुका घेण्यात येतील.

राज्य विधिमंडळाने कायदा केला असल्याने वॉर्ड किंवा प्रभाग रचना हा पूर्णपणे राज्य सरकारचा अधिकार आहे असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

**सर्व याचिका फेटाळल्या : नवीन प्रभाग रचना**

**प्रभाग रचना निश्चित करणे हा राज्याचा अधिकार**

दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नवी प्रभाग रचना की जुनी प्रभाग रचना याविषयी वाद सुरू होता. महाविकास आघाडीच्या काळात प्रभाग रचनेमध्ये काही बदल करण्यात आले होते. त्यानंतर शिंदे- फडणवीस सरकारच्या काळात पुन्हा त्या प्रभाग रचनेत बदल करण्यात आले. मात्र, वॉर्ड रचना कशी असावी याचा अधिकार पूर्णपणे राज्य सरकारचा आहे, त्यानुसार प्रभाग रचना होईल. जी प्रभाग रचना राज्य सरकार ठरवेल त्यानुसारच निवडणुका होईल, असे आज सर्वोच्च न्यायालयाने आदेशात स्पष्ट केले आहे.

### झारखंडचे माजी सीएम
## शिबू सोरेन यांचे निधन
### गंगाराम रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास



■ वृत्तसंस्था
रांची, दि. ४ :
राज्यसभा खासदार आणि झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन (गुरुजी) यांचे सोमवारी निधन झाले. त्यांनी दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला.

गेल्या काही दिवसांपासून ते तिथेच दाखल होते. न्यूरोलॉजी, कार्डिओलॉजी आणि नेफ्रोलॉजीमधील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम त्यांच्यावर उपचार करत होती. त्यांची प्रकृती गंभीर होती. त्यांना ब्रेन स्ट्रोक आला होता. त्यामुळे त्यांच्या शरीराच्या डाव्या बाजूला अर्धांगवायू झाला होता.

८१ वर्षीय गुरुजी बऱ्याच काळापासून किडनीच्या आजाराने ग्रस्त होते. गेल्या एक वर्षापासून ते डायलिसिसवर होते. त्यांना मधुमेह होता, तसेच त्यांच्या हृदयाची बायपास शस्त्रक्रियादेखील झाली होती.

शिबू सोरेन हे झारखंड मुक्ती मोर्चाचे संस्थापक संरक्षक होते. ते यूपीएच्या पहिल्या कार्यकाळात कोळसा मंत्री होते. तथापि, चिरुडीह हत्याकांडात त्यांचे नाव आल्यानंतर त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा दिला. ८१ वर्षीय दिशाम गुरु शिबू सोरेन यांचा जन्म ११ जानेवारी १९४४ रोजी सध्याच्या रामगड जिल्ह्यातील गोला ब्लॉकमधील नेमरा येथे झाला. गावातील शाळेतून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर दिशाम गुरु यांचे आयुष्य संघर्षांनी भरलेले होते.

वडिलांच्या हत्येनंतर, त्यांना समजले की आदिवासी समाजाला सावकारांविरुद्ध एकत्र करणे हे शिक्षणापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे. त्यांनी सावकारांविरुद्ध काम करण्यास सुरुवात केली. १९७० मध्ये त्यांनी उघडपणे सावकारांविरुद्ध बाहेर पडून भात कापणी चळवळ सुरू केली. शिबू सोरेन सावकारांविरुद्ध चळवळीचे नेतृत्व करून प्रसिद्ध झाले.

**दिशाम गुरु ते मुख्यमंत्री**
— पान ४ वर —

अग्राग्रलेख

**खरीखरी...**

## आदिवासींचा लढवय्या हरपला !

झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांना आज देवाज्ञा झाली. ते केंद्रीय मंत्रिमंडळातील माजी मंत्री होते. या सर्व मंत्रिपदांपेक्षा ते आदिवासी समाजाचे फार मोठे नेते होते. झारखंडच्या सध्याच्या मुख्यमंत्र्यांचे म्हणजेच हेमंत सोरेन यांचे ते पिताश्री होते. त्यांचे निधन म्हणजे आदिवासी समाज आणि विशेषता झारखंडच्या राजकारणाला फारच मोठा धक्का आहे. शिबू सोरेन झारखंड मधील तळागाळातील पिचलेल्या आदिवासी जनतेचे अत्यंत विश्वासू नेते होते. त्यांच्या निधनामुळे देशाने एक अत्यंत तळागाळात काम करणारा आणि आदिवासींच्या समस्येसाठी झटणारा आदिवासींचा नेता गमावला आहे. झारखंड राज्याची स्थापना झाल्यावर या राज्याने जी प्रगती केली आहे. त्यामध्ये शिबू सोरेन यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणि त्यांच्या योजनांचा मोठा वाटा आहे. देशातील आजची परिस्थिती पाहता त्यांचे कार्य आणि निर्णय आणखीनच दृष्टिक्षेपात येतात आणि महत्त्वाचे ठरतात. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर अनेक राज्यातील तळागाळातील जनतेचे नेतृत्व करून प्रस्थापिता विरुद्ध तळागाळातील जनतेच्या सोबत जाण्यासाठी जे जे प्रयत्न केले गेले. त्यामध्ये बिहारचा मोठा वाटा होता, विशेष म्हणजे शिबू सोरेन यांचा त्यामध्ये फार मोठा वाटा होता. आदिवासी आणि ओबीसींना त्यांच्यामुळेच काही अंशी न्याय मिळाला असे बरेच लोक बोलतात. त्यांच्या प्रयत्नांशिवाय आदिवासींना त्या काळात न्याय मिळत नव्हता हेही बऱ्याच लोकांनी सांगितलेले आहे. सध्या त्यांचे सुपुत्र हेमंत सोरेन झारखंडच्या जनतेची सेवा करीत आहेत. त्यांची सेवा हे सुद्धा शिबू सोरेन यांच्या आशीर्वादाचे फलित आहे. सध्याच्या भारतीय राजकारणामध्ये आदिवासी, मागासवर्गीय, आणि ओबीसी यांना कधीच डावलता येणार नाही. वर्षानुवर्ष अन्याय सहन करत करत अन्यायाचा प्रतिकार करत जगणाऱ्यांसाठी हक्काची मागणी करणे आणि त्यासाठी सतत लढत राहणे, अशा प्रकारचे शिबू सोरेन यांचे समाजकारण होते. वरवर पाहता ते तितके सोपे नव्हते. मात्र आरक्षित समाज आणि आदिवासी यांच्यासाठी झारखंडचे माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन यांनी केलेले काम कधीच विसरता येणार नाही. हेच या निमित्ताने आम्हाला सांगावयाचे आहे. आदिवासींसाठी एक सातत्यपूर्ण काम करणारा एक लढवय्या नेता हरपला आहे. त्याला आम्ही आदरांजली वाहतो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### महाराष्ट्रात मराठी अमराठीचा
## कोणताही वाद नाही
### मुख्यमंत्री फडणवीस यांचा दावा



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी मराठी - अमराठीच्या मुद्यावर वादग्रस्त विधान करणारे भाजप खासदार निशिकांत दुबे यांना आपले तोंड बंद ठेवण्याचा सल्ला दिला.

महाराष्ट्रात मराठी व अमराठी माणूस सुरक्षित आहे. इथे कोणताही वाद नाही. काहीजण या प्रकरणी मुद्दाम वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण मराठी जनता त्यांना निवडणुकीत त्यांची योग्य जागा दाखवेल. त्यामुळे दुबे यांनी या प्रकरणी कोणतीही विधाने करून नयेत, असे त्यांनी म्हटले आहे.

मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीत राज व उद्धव ठाकरे यांचे राजकारण पूर्णपणे संपेल असे वादग्रस्त विधान भाजप आमदार निशिकांत दुबे यांनी केले आहे. त्यांच्या या विधानाचे महाराष्ट्राचे राजकारण तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी सोमवारी याविषयी बोलताना त्यांना असे काहीही न बोलण्याचा सल्ला दिला.

ते म्हणाले, निशिकांत दुबे यांनी अशा प्रकारची वक्तव्य करू नयेत. येथील परिस्थिती हँडल करण्यासाठी आम्ही सक्षम आहोत. इथला मराठी व अमराठी माणूस सुरक्षित आहे. सगळे एकमेकांसोबत योग्यप्रकारे राहत आहेत. महाराष्ट्रात मराठी व अमराठी असा कोणताही वाद नाही. काहीजण मुद्दाम वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या लोकांना मराठी जनता व अमराठी जनता निवडणुकीत त्यांची जागा दाखवतील. त्यामुळे माझा सल्ला दुबेंना असा असेल की, या विषयात त्यांनी कोणतेही वक्तव्य करू नये.

मुंबई महापालिकेवर आमचीच सत्ता येईल असे म्हणण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. राज ठाकरेच काय, मुंबईतील छोट्यातील छोटी पार्टीही असे म्हणू शकते. आमचे रामदास आठवले साहेबही म्हणतात. आता ते आमच्यासोबत आहेत. पण ते वेगळे लढले असते तर त्यांनीही मुंबई महापालिकेवर आमचाच झेंडा लागणार असल्याचा दावा केला असता. पण आता त्यांचा झेंडा आमच्यासोबतच लागणार आहे. त्यामुळे जो पक्ष चालवतो त्याला तसे म्हणण्याचा अधिकार आहे. मुंबईत कोण सोबत येते कोण सोबत येत नाही यासंदर्भात मला काही म्हणायचे नाही.

## राहुल गांधींना सुप्रीम कोर्टाची फटकार



■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने काँग्रेस नेते राहुल गांधी यांना फटकारले. विचारले, चीनने २००० चौरस किमी भारतीय भूमीवर कब्जा केला आहे हे तुम्हाला कसे कळले? विश्वसनीय माहिती काय आहे? जर तुम्ही खरे भारतीय असता तर तुम्ही असे म्हटले नसते.

न्यायालयाने म्हटले, जेव्हा सीमेपलीकडे संघर्ष सुरू असतो, तेव्हा तुम्ही हे सर्व बोलू शकता का? तुम्ही संसदेत प्रश्न का विचारू शकत नाही? तुम्ही विरोधी पक्षनेते आहात, संसदेत बोला, सोशल मीडियावर नाही. तथापि, लष्करावरील टिप्पणीप्रकरणी न्यायालयाने राहुल गांधींना दिलासा दिला आहे.

## युतीसाठी आणखी प्रतीक्षा करा...

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि.४ :
आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी पक्षाचे प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांचा मेळावा घेतला. या वेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्या पक्षासोबत युती बाबत अद्याप थोडी प्रतीक्षा करण्याच्या सूचना केल्या आहेत.



मात्र, २० वर्षांनंतर आम्ही दोघे भाऊ एकत्र येऊ शकतो, तर तुम्ही का भांडता? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी मतभेद मिटवून एकत्र येण्याच्या सूचना सर्वांना केल्या आहेत.

या मेळाव्यात राज ठाकरे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांच्या पक्षासोबत युती बाबत योग्य वेळी सांगेल. युतीचे काय करायचे? ते माझ्यावर सोड. मात्र, आपापसातील मतभेद मिटवा आणि कामाला लागा, मराठीचा मुद्दा घराघरात पोहोचवा, हिंदी भाषिकांचा द्वेष करु नका, अशा सूचना देखील त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या.

# ओव्हल टेस्ट जिंकला भारत



■ वृत्तसंस्था
लंडन, दि. ४ :
ओव्हल कसोटीच्या शेवटच्या दिवशी ४ विकेट घेत भारताने ६ धावांनी विजय मिळवला. यासह, संघाने ५ सामन्यांच्या अँडरसन-तेंडुलकर ट्रॉफीमध्ये २-२ अशी बरोबरी साधली. मोहम्मद सिराजने दुसऱ्या डावात ५ विकेट घेत सामना उलटला आणि संघाला रोमांचक विजय मिळवून दिला.

गुरुवारी ओव्हल येथे इंग्लंडने गोलंदाजीचा निर्णय घेतला. भारताने पहिल्या डावात २२४ आणि इंग्लंडने २४७ धावा केल्या. २३ धावांनी पिछाडीवर राहिल्यानंतर भारताने दुसऱ्या डावात ३९६ धावा केल्या. इंग्लंडला ३७४ धावांचे लक्ष्य मिळाले. संघाने ३ विकेट गमावून ३०० धावा केल्या होत्या.

त्यानंतर हॅरी ब्रूक शतक ठोकून बाद झाला. येथून, भारताने ३५४ पर्यंत इंग्लंडचे ८ बळी घेतले.

चौथ्या दिवशी जो रूटने १०५ आणि हॅरी ब्रूकने १११ धावा केल्या आणि संघाला विजयाच्या जवळ आणले. मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णाने ३-३ बळी घेतले आहेत. आकाशदीपने १ बळी घेतला. सामन्याच्या चौथ्या दिवशी पावसामुळे शेवटच्या ९० मिनिटांचा खेळ होऊ शकला नाही.

कसोटी क्रिकेटच्या इतिहासात पहिल्यांदाच एका मालिकेत ९ फलंदाजांनी ४०० धावांचा टप्पा ओलांडला आहे. सध्याच्या मालिकेत भारतातील ५ आणि इंग्लंडच्या ४ फलंदाजांनी ४०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

कसोटी इतिहासातील ही दुसरी मालिका आहे ज्यामध्ये ७००० पेक्षा जास्त धावा झाल्या आहेत. याआधी १९९३ च्या अॅशेस मालिकेत ७२२१ धावा झाल्या होत्या.

**इंग्लंडमध्ये सीरीज २-२ ने बरोबरीत**

**५ विकेट घेत सिराजने पलटली मॅच**

### वाल्मीकची मालमत्ता जप्त करा
## न्यायालयात याचिका

■ वृत्तसंस्था, बीड, दि. ४ :
मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड व त्याच्या सहकाऱ्यांची मालमत्ता जप्त करण्यासंबंधीची एक याचिका बीडच्या विशेष मकोका न्यायालयात दाखल करण्यात आली आहे.

या याचिकेमुळे वाल्मीकसह धनंजय मुंडे यांची मालमत्ता जप्त होणार का? अशी चर्चा बीडच्या पंचक्रोशीत सुरू झाली आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी काही दिवसांपूर्वी वाल्मीक कराड व धनंजय मुंडे यांच्या संयुक्त मालमत्तेचे काही दस्तऐवज सार्वजनिक केले होते. त्यामुळे ही चर्चा सुरू झाली आहे हे विशेष.

बीडच्या कोर्टात आज संतोष देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. आजच्या सुनावणीत सुदर्शन घुले व इतर आरोपींनी दाखल केलेल्या दोषमुक्तीच्या याचिकेवर सुनावणी होणार आहे.

यावेळी वाल्मीक कराड व त्याच्या सहकाऱ्यांची मालमत्ता रद्द करण्यासंबंधी सरकारी वकिलांनी केलेल्या याचिकेवरही सुनावणी होण्याची शक्यता आहे. अंजली दमानिया यांनी काही दिवसांपूर्वी एक पोस्ट केली होती. त्यात वाल्मीक कराड व धनंजय मुंडे यांच्या संयुक्त मालमत्तेंचे दस्तऐवज जाहीर केले होते. त्यामुळे नव्या याचिकेवर सुनावणी करताना कोर्टाने वाल्मीक कराडच्या मालमत्तेसह भागीदारीत असणाऱ्या मालत्तांवरही टाच आणण्याचे आदेश दिले, तर त्याचा थेट फटका धनंजय मुंडे यांना बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## इंडिया आघाडीच्या बैठकीला उद्धव ठाकरे जाणार
### राहुल गांधींच्या निवासस्थानी स्नेहभोजनाचे निमंत्रण : दिल्लीत आखली जाणार रणनीती

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :
महाराष्ट्रात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर केल्या जाणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांकडून रणनीती आखली जात आहेत. तसेच मुंबई महापालिका समोर ठेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्यात युती होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यात आता इंडिया आघाडीची बैठक राजधानी दिल्लीत होणार असून उद्धव ठाकरे दिल्लीला जाणार असल्याची माहिती समोर आली आहे.

विधानसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर इंडिया आघाडीची एकही बैठक झाली नाही. आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार असल्याने आता बैठक आयोजित करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी दिल्लीत पोहोचणार असल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्या



निवासस्थानी उद्धव ठाकरे यांना भोजनाचे निमंत्रण देखील असल्याची माहिती आहे.

इंडिया आघाडीची बैठक ७ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली आहे. त्यानुसार उद्धव ठाकरे हे ६ ऑगस्ट रोजी सायंकाळी दिल्लीत पोहोचणार आहेत. तसेच सध्या पावसाळी अधिवेशन सुरू असून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार दिल्लीतच आहेत. शिवसेना ठाकरे गटाच्या खासदारांची बैठक घेतली जाणार आहे. इंडिया आघाडीच्या बैठकीला सर्व प्रमुख नेते उपस्थित असणार आहेत.

महाराष्ट्रातून उद्धव ठाकरे, शरद पवार, सुप्रिया सुळे, संजय राऊत, आदित्य ठाकरे इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित असणार आहेत. त्याचसोबत इंडिया आघाडीचे इतर राज्यातील प्रमुख नेत्यांना देखील निमंत्रण देण्यात आले आहे. पावसाळी अधिवेशन असल्याने इंडिया आघाडीचे सर्वच प्रमुख नेते सध्या दिल्लीतच आहेत.

## पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी स्थानिक नव्हे तर पाकिस्तानी
### पाकच्या राष्ट्रीय डेटाबेसशी जुळले पुरावे

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ४ :
२८ जुलै रोजी ऑपरेशन महादेवमध्ये मारले गेलेले तीन दहशतवादी स्थानिक नव्हते तर पाकिस्तानी होते. सुरक्षा एजन्सीच्या एका अधिकाऱ्याने पुराव्यांच्या आधारे वृत्तसंस्था पीटीआयला ही माहिती दिली. अधिकाऱ्याने सांगितले की, दहशतवाद्यांकडून आणि चकमकीच्या ठिकाणाहून मिळालेल्या पुराव्यांवरून ते पाकिस्तानचे असल्याचे स्पष्ट झाले.

सुरक्षा दलांना चकमकीच्या ठिकाणी दहशतवाद्यांकडून पाकिस्तानी मतदार ओळखपत्रासह पुरावे मिळाले. सुरक्षा एजन्सीने हे पुरावे पाकिस्तानच्या राष्ट्रीय डेटाबेस आणि नोंदणी प्राधिकरणाशी जुळवले. दहशतवाद्यांचे मतदार ओळखपत्र आणि बायोमेट्रिक रेकॉर्ड पाकिस्तान सरकारने जाहीर केलेल्या तपशीलांशी जुळले. यामध्ये सॅटेलाइट फोन आणि जीपीएस डेटा देखील समाविष्ट आहे. अधिकाऱ्याने सांगितले, हे पुरावे दहशतवाद्यांचे पाकिस्तानी नागरिकत्व सिद्ध करतात.

बायोमेट्रिक रेकॉर्ड (बोटांचे ठसे, चेहऱ्याची ओळख, कुटुंबाची माहिती) पाकिस्तानच्या राष्ट्रीय डेटाबेसशी जुळली. पाकिस्तान निवडणूक आयोगाकडून मतदार ओळखपत्र स्लिप, सॅटेलाइट फोन, पाकिस्तानमध्ये बनवलेले चॉकलेट रॅपर्स आणि अन्य पुरावे पाकशी जुळले आहेत.

## मुंडेंना सोडवेना 'सातपुडा' बंगला



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :
परळीचे आमदार आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी अद्याप मंत्री असताना वास्तव्यास दिलेला सातपुडा बंगला सोडला नसल्याची माहिती आहे.

यामुळे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांना शासकीय निवासस्थानासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. धनंजय मुंडे यांनी नियमानुसार १५ दिवसांच्या आत बंगला रिकामा करणे अपेक्षित होते. पण साडेचार महिने उलटून गेले तरी मुंडे यांनी बंगला सोडलेला नाही. दरम्यान, सातपुडा बंगल्याच्या मुद्द्यावरून अजित पवारांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे दोन नेते आमने-सामने आले आहेत.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या पार्श्वभूमीवर माजी मंत्री धनंजय मुंडे अडचणीत आले होते. विरोधकांकडून मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी सुरू झाली होती. अखेर, धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. मात्र, त्यांनी बंगला रिकामा न केल्यामुळे वेगळीच चर्चा रंगली आहे.

धनंजय मुंडे यांनी सातपुडा बंगला सोडला नसल्याने आता बंगल्याचा ताबा घेणाऱ्या नव्या मंत्र्यांना अडचण निर्माण झाली आहे. धनंजय मुंडेंनी राजीनामा दिल्यानंतर छगन भुजबळ यांची मंत्रिमंडळात वर्णी लागली. पण भुजबळ यांना आजही सातपुडा बंगला मिळण्याची प्रतीक्षा आहे. शासनाने २३ मे रोजी भुजबळ यांच्यासाठी सातपुडा बंगल्याचा अधिकृत आदेश काढला, पण धनंजय मुंडे यांनी बंगला रिकामा न केल्याने नवीन अन्न व नागरी पुरवठा मंत्री भुजबळ यांना अद्याप तिथे प्रवेश मिळालेला नाही.

दरम्यान, सातपुडा बंगल्याचे क्षेत्रफळ ४६६७ चौरस फूट आहे. धनंजय मुंडे यांना महिन्याला ९ लाख ३३ हजार रुपये दंड लागत असून, आता ही रक्कम ४२ लाखांपर्यंत पोहोचली आहे. ही रक्कम दिवसेंदिवस वाढत आहे. तरीही ते बंगला सोडत नाहीत. दुसरीकडे, बंगला न मिळाल्याने भुजबळ अद्यापही प्रतिक्षेत आहेत.

### गणेशोत्सवात रात्री उशिरापर्यंत
## लोकल सुरु ठेवा
### मंत्री मंगलप्रभात लोढा यांची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :
महाराष्ट्र आणि मुंबई एमएमआर परिसरात साजरा होणारा गणेशोत्सव जगप्रसिद्ध असून रात्री उशिरापर्यंत गणेशभक्त दर्शनासाठी येत असतात अशा वेळी गणेश भक्तांसाठी लोकल आणि मेट्रो सुरु ठेवावी, यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरासह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

गणेशोत्सवादरम्यान महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गणेशभक्त मुंबई परिसरात दाखल होतात. या स्थितीत भक्तांच्या सोयीसाठी सार्वजनिक वाहतूक सुरु असणे अतिशय महत्वाचे आहे. त्यासंदर्भात रेल्वे आणि मेट्रो प्रशासनाशी पत्र व्यवहार सुरु असल्याची माहितीही मंत्री लोढा यांनी जनता दरबारात दिली. प्रशासकीय यंत्रणा राबवून थेट जनतेपर्यंत पोहोचले पाहिजे. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या पाहिजेत, अशी सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रिमंडळातील सदस्यांना केली होती. या सूचनेला अनुसरूनच या जनता दरबाराचे आयोजन केल्याचे लोढा यांनी स्पष्ट केले.

गेल्या महिनाभरात दक्षिण मुंबईत झालेल्या पाच जनता दरबारात ऑनलाईन आणि ऑफलाईन मिळून सुमारे २ दोन हजार नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. नागरिकांच्या नागरी समस्या सोडवण्यासाठी विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना एकाच छताखाली आणण्यात आले.

# राज्यात अवयवदान पंधरवडा

## प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेतील हजारो रुग्णांना आशेचा किरण

■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ४ :

राज्यात हजारो रुग्ण अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत. वेळेवर अवयव न मिळाल्याने मृत्यू होणाऱ्या रुग्णांची संख्याही अधिक आहे. त्यामुळे अवयवदान चळवळीत आणखी वाढ करण्यासाठी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने अवयवदान पंधरवडा रविवारपासून सुरू केला. या उपक्रमाच्या माध्यमातून अवयवदानास प्रोत्साहन दिले जाणार असून, गरजू रुग्णांना लवकरात लवकर अवयव मिळावेत, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.



सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबिटकर यांनी स्वतः अर्ज भरून अवयवदानाची शपथ घेतली आणि या अवयवदान पंधरवड्याचा रविवारी प्रारंभ केला. नागरिकांनी या अभियानामध्ये सहभागी होऊन अवयवदानाची शपथ घ्यावी, असे आवाहनही आरोग्यमंत्री आबिटकर यांनी केले. अंगदान जीवनदान संजीवनी अभियानांतर्गत राज्यात ३ ते १५ ऑगस्टदरम्यान अवयवदान पंधरवडा अभियान राबविण्यात येत आहे. या कालावधीत जनजागृती व समाजाभिमुख उपक्रम राबवण्याचे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी दिले आहेत.

या मोहिमेत शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, धार्मिक संस्था, आरोग्य संस्था व सामाजिक कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग असणार आहे. अवयवदान क्षेत्रात देश आणि राज्य स्तरावर काम करणाऱ्या संस्था प्रादेशिक अवयव प्रत्यारोपण समित्या (रोट्टो), राज्य अवयव प्रत्यारोपण समिती (सोट्टो), विभागीय प्रत्यारोपण समन्वय समित्या (झेडटीसीसी) यांच्या सहकार्याने हे अभियान राज्यभरात राबविण्यात येणार आहे. या मोहिमेतून अवयवदानासंबंधी भीती आणि गैरसमज दूर करून वैज्ञानिक माहिती लोकांपर्यंत पोहोचविली जाणार आहे. या पंधरवड्यात राज्यातील प्रत्येक जिल्हा, तालुका व आरोग्य संस्था स्तरावर, शाळा, महाविद्यालये येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानंतर १५ ऑगस्टला जिल्हा स्तरावर अवयवदात्यांच्या कुटुंबीयांचा सन्मान करून मोहिमेला प्रेरणादायी रूप दिले जाणार आहे.

राज्यात मूत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांची संख्या तब्बल ७ हजार २७१ आहे. त्याखालोखाल यकृत प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेतील रुग्णांची संख्या १ हजार ८८३ आहे. त्यानंतर हृदय १२२, फुफ्फुस ३८, मूत्रपिंड व स्वादुपिंड ३२, लहान आतडे ५, हात ९, मूत्रपिंड व यकृत ३८, हृदय व फुफ्फुस १८, हृदय व मूत्रपिंड १ आणि स्वादुपिंड ६ एवढे रुग्ण अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत.

## जितेंद्र आव्हाडांचा हिंदूंना बदनाम करण्याचा प्रयत्न मान्य आहे का?

### भाजपचा उद्धव ठाकरे यांना सवाल



**मुंबई:** कथित सनातनी दहशतवादाच्या मुद्यावरून भाजपने उद्धव ठाकरेंवर तिखट शब्दांत हल्ला चढवला आहे. काँग्रेस व राष्ट्रवादीचा शरद पवार गट आमदार जितेंद्र आव्हाड यांना पुढे करून देशात सनातनी दहशतवादाचा फेक नरेटिव्ह पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचा हा प्रयत्न उद्धव ठाकरे यांना मान्य आहे का? की त्यांनी आव्हाडांपुढेही गुडघे टेकलेत? अशी विचारणा भाजपने या प्रकरणी केली आहे. मुंबई स्थित विशेष एनआयए कोटार्ने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्वच आरोपींची निर्दोष सुटका केली आहे. कोर्टाच्या या निर्णयानंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी कथित सनातनी दहशतवादावर सडकून टीका केली आहे. या पार्श्वभूमीवर भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी सोमवारी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत उद्धव ठाकरेंवर हल्ला चढवला आहे. केशव उपाध्ये म्हणाले, भगव्या दहशतवादाचा पेक नरेटिव्हचा कट कोर्टाने उधळून लावला. त्यानंतर आता काँग्रेसी संस्कृतीने सनातन हिंदू धर्माच्या नावाने सुरू केलेला अपप्रचार म्हणजे महात्मा गांधींचा वारसा स्वतःच्या हाताने पुसून टाकण्याची तयारी आहे. हिंदुत्वाचे मुखवटे धारण केलेल्या काँग्रेसच्या ताटाखालील मांजरांनी सनातन धर्मास दहशतवादी ठरवण्याच्या कटात सहभागी होऊन आपलाही मुखवटा उतरवल्याचे स्पष्ट झाले आहे.

## सप्टेंबर महिन्यात देशात महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडू शकतात : संजय राऊत



**मुंबई:** सप्टेंबर महिन्यात देशात महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडू शकतात. पंतप्रधानांनी राष्ट्रपतींची भेट घेणे हा त्यांच्या कामाचा भाग आहे. ते राष्ट्रपतींना भेटायला जातात हेच महत्त्वाचे आहे. राष्ट्रपतींना ते भेटायला बोलावत नाहीत, ही बातमी आहे. या देशात सध्याच्या कामाच्या पद्धती पाहता काहीही होऊ शकते. काय होते ते पाहू, असे संजय राऊत म्हणाले. दिल्लीत संसदीय पावसाळी अधिवेशन सुरू असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली. या भेटीमध्ये महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाल्याची माहिती मिळत असून, या भेटीवर संजय राऊत यांनी उपरोक्त दावा केला आहे. संजय राऊत म्हणाले की, सध्या आपल्या देशात राष्ट्रपतींचे अधिकार काय आहेत? हे आपल्याला माहित आहे. राष्ट्रपतींच्या सल्ल्याने सरकार किती काम करते हे सुद्धा आपल्याला माहित आहे. आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची एक महत्त्वाची बैठक आहे. माझ्या माहितीप्रमाणे त्या बैठकीत सुद्धा महत्त्वाच्या भविष्यातल्या घडामोडींवर चर्चा होण्याची शक्यता आहे. जे सातत्याने सांगितले जात आहे की, सप्टेंबर महिन्यात या देशात महत्त्वाच्या राजकीय घडामोडी घडतील. ७ ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीची बैठक आहे. राहुल गांधी या बैठकीचे निमंत्रक आहेत. राहुल गांधी यांनी स्वतः सर्वांना फोन करून निमंत्रण दिले आहे.

## कोथरूडमध्ये दलित तरुणींचा पोलिसांकडून छळ

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ४ :

कोथरूड पोलिस ठाण्यात तिन्ही दलित तरुणींवर पोलिसांकडून कथित छळ केल्याची धक्कादायक घटना रविवारी उघड झाली आहे. या प्रकरणात तब्बल 24 तास उलटल्यानंतरही पुणे पोलिसांकडून कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. परिणामी, राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी एका पोलिस अधिकाऱ्याला फोन करून निवार्णीचा इशारा दिला. पुण्यातील या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यासाठी रविवारी रात्रीपासून आमदार रोहित पवार, वंचित बहुजन आघाडीच्या नेत्या अंजली आणि सुजात आंबेडकर यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते पुणे पोलिस आयुक्तालयात ठाण मांडून बसले होते. पहाटे साडेतीन वाजेपर्यंत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा झाली, मात्र एफआयआर नोंदवण्यात आला नाही. यानंतर संतप्त झालेल्या प्रकाश आंबेडकर यांनी कदम नावाच्या पोलिस अधिकाऱ्याला फोन लावून याबद्दल जाब विचारला.


प्रकाश आंबेडकर यांनी कदम नावाच्या पोलिस अधिकाऱ्याला फोन लावला. मात्र, एक-दोन दिवसांत एफआयआर दाखल करुन घेऊ, असे तो अधिकारी सांगत होता. त्यावर प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, एक लक्षात घ्या कदम.... ती मुलगी 25 वर्षांची आहे. कुठलातरी पोलिस औरंगाबादमधून येतो आणि हे सगळ्या कोणाच्यातरी घरात घुसतात. हे पोलिस कोणत्या कायद्याखाली मुलींच्या घरात घुसतात? असा सवाल प्रकाश आंबेडकर यांनी विचारला. पोलिसांना कोणाच्या घरात घुसण्याचा परवाना दिलेला नाही ना? त्यामुळे तुम्ही याप्रकरणात मुलींच्या तक्रारीनुसार, एफआयआर नोंदवून घ्या आणि मग त्याचा तपास करा, अशा शब्दांत त्यांनी पोलिस अधिकाऱ्याला खडसावले.

त्यावर पोलिस अधिकाऱ्याने दोन दिवस थांबा, अशी विनंती करताच संतप्त झालेल्या प्रकार आंबेडकरांनी 'दोन दिवस नाही ताबडतोब एफआयआर झाली पाहिजे. नाहीतर मी त्यांना सांगतो, धरणे देऊन बसा. कायदा हा कायदा आहे. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. चौकशी होत राहील, त्यामधून सत्य समोर येईल.

# आज हीरक महोत्सवी राज्य चित्रपट पुरस्कार सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांचा हीरक महोत्सवी सोहळा मंगळवार, ५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता वरळी येथील एनएससीआय डोम येथे होणार आहे. याप्रसंगी ६० आणि ६१ वे महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारही यावेळी प्रदान केले जाणार आहेत तसेच खास स्मरणिकाही प्रकाशित करण्यात येणार आहे. राज्य चित्रपट पुरस्कारांमध्ये संगीत क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या गानसम्राज्ञी लता मंगेशकर




पुरस्कार २०२५ या पुरस्काराने गझलनवाज भीमराव पांचाळे यांना सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच २०२४ सालासाठीचा चित्रपती कै. व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार प्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते महेश मांजरेकर यांना तर चित्रपती कै. व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री मुक्ता बर्वे यांना देऊन सन्मानित करण्यात येणार आहे त्याचबरोबर २०२४ सालासाठीचा स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ अभिनेते अनुपम खेर यांना आणि स्व. राज. कपूर विशेष योगदान पुरस्कार अभिनेत्री काजोल यांना दिला जाणार आहे. या प्रतिष्ठित पुरस्कारांबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज महावारसा पुरस्कार २०२५ या पुरस्काराची घोषणा करण्यात आली असून सांस्कृतिक वारसा आणि इतिहास जपणाऱ्या कार्यकर्त्यांचा गौरव या पुरस्काराने करण्यात येणार आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

## आंतरजातीय प्रेमविवाह केल्याने तरुणाला बेदम मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. ४ :

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात आंतरजातीय प्रेमविवाह केल्याच्या कारणावरून एका 39 वर्षीय तरुणाला गावातच दिवसाढवळ्या घरात घुसून बेदम मारहाण करण्यात आली, आणि त्यानंतर त्याच्या पत्नीचे लोकांनी अपहरण केले. तरुणीच्या आई आणि भावानेच हे धक्कादायक कृत्य केले आहे. या घटनेचा थरारक व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत असून, संतापाची लाट उसळली आहे. याप्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.

पीडित तरुणाचे नाव विश्वनाथ बबन गोसावी असून तो सध्या गंभीर जखमी अवस्थेत उपचार घेत आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही मारहाण आणि अपहरण आंतरजातीय प्रेमविवाहामुळे घडली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विश्वनाथ गोसावी याचे प्राजक्ता (वय २८) या तरुणीसोबत प्रेमसंबंध होते. मात्र, मुलीच्या घरच्यांचा विश्वनाथ आणि प्राजक्ताच्या नात्याला विरोध होता. असे असतानाही दोघांनी काही दिवसांपूर्वी आळंदी येथे वैदिक पद्धतीने विवाह केला. मात्र, हा आंतरजातीय विवाह प्राजक्ताच्या कुटुंबियांना मान्य नव्हता. मुलीने पळून जाऊन आंतरजातीय विवाह केल्यामुळे समाजात आपली बदनामी झाल्याचा राग त्यांच्या मनात होता. यातूनच त्यांनी प्राजक्ता आणि विश्वनाथ यांना आधी जबर मारहाण केली. त्यानंतर त्यांनी प्राजक्ताचे अपहरण केले. भरचौकात ही मारहाण आणि अपहरणाची घटना घडली. घटनास्थळी उपसस्थितांनी हा सर्व प्रकार आपल्या मोबाईलमध्ये कैद केला. प्राजक्ताच्या दोन भावांसह तिच्या आईने आणि इतर 15 जणांनी आधी विश्वनाथच्या घरात घुसून त्याला बेदम मारहाण केली आणि नंतर त्याच्या पत्नीला जबरदस्तीने घेऊन गेले.

या घटनेचा एक थरारक व्हिडीओ एका स्थानिक नागरिकाने आपल्या मोबाईलमध्ये शूट केला, ज्यात आरोपींचा जमाव विवाहितेला जबरदस्तीने वाहनात कोंबून नेतो आहे, हे स्पष्टपणे दिसतं. हा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला आहे. या प्रकरणी खेड पोलिस ठाण्यात आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांचा शोध सुरू आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस करत आहेत.

## राज ठाकरेंविरोधातील याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

### उच्च न्यायालयात जाण्याचा दिला सल्ला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात उत्तर भारतीय समुदायाविरोधात द्वेषमूलक भाषण आणि हिंसाचार भडकवल्याचा आरोप करत एक जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली असून, याचिकाकर्त्याला फटकारत मुंबई उच्च न्यायालयात जाण्याचा सल्ला दिला.

उत्तर भारतीय विकास सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनिल शुक्ला यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे वकील घनश्याम उपाध्याय यांच्या मार्फत शुक्रवारी 18 जुलै 2025 रोजी ही याचिका दाखल केली होती. राज ठाकरे आणि मनसे कार्यकर्त्यांविरुद्ध फौजदारी कारवाई करावी आणि निवडणूक आयोगाने मनसे पक्षाची राजकीय मान्यता रद्द करावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती.

या याचिकेवर सरन्यायाधीश बी. आर. गवई आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठासमोर आज सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान, सरन्यायाधीशांनी याचिकाकर्त्याचे वकील यांना "तुम्ही थेट सर्वोच्च न्यायालयात का आलात? मुंबई उच्च न्यायालय सुट्टीवर आहे का?" असा सवाल केला. त्यानंतर याचिकाकर्त्याने मी याचिका मागे घेऊ शकतो का? असे विचारले. त्यानंतर कोटार्ने याचिका मागे घेण्याची परवानगी दिली आणि मुंबई हायकोर्टात जाण्याचा सल्ला



दिला. "याचिकाकर्त्याचे वकील हायकोर्टात जाण्याचे स्वातंत्र्य असल्याचे सांगत ते याचिका मागे घेत आहे. आम्ही स्पष्ट करतो की आम्ही याचिकेच्या गुणवत्तेचा विचार केलेला नाही," असे कोटार्ने आदेशात म्हटले.

याचिकेत शुक्ला यांनी म्हटले आहे की, राज ठाकरे यांनी 30 मार्च 2025 रोजी गुढीपाडवा मेळाव्यात केलेल्या प्रक्षोभक भाषणामुळे हिंदी भाषिकांविराधोत हिंसा वाढली. या भाषणानंतर मुंबईतील पवई, वसोर्वा आदी ठिकाणी हिंदी भाषिक कर्मचाऱ्यांवर हल्ले करण्यात आले.

या भाषणाआधी आणि नंतरही त्यांना धमक्या, छळ, आणि जीवाला धोका निर्माण करणारे प्रकार वारंवार घडले. एका ट्वीटमध्ये त्यांचा खून करण्याचे उघड आवाहन करण्यात आले. 100 हून अधिक अज्ञात फोन कॉलद्वारे धमक्या मिळाल्या. 6 ऑक्टोबर 2024 रोजी मनसेशी संबंधित सुमारे 30 जणांच्या गटाने त्यांच्या पक्षाच्या कार्यालयावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

## १२ मठाधिपतींनी शिवसेनेत प्रवेश

### एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वाला पाठिंबा

■ महासागर प्रतिनिधी
ठाणे, दि. ४ :

हिंदुत्वाचा गड असलेल्या बेळगावातून आज भगवा आणखी फडकला! कर्नाटकातील नामवंत मठाधिपतींचा शिवसेनेत प्रवेश झाल्याने संपूर्ण सीमाभागात राजकीय खळबळ उडाली आहे. ठाण्यात झालेल्या या ऐतिहासिक कार्यक्रमात १२ मठाधिपतींनी थेट शिवसेनेचा भगवा हाती घेत, एकनाथ शिंदे यांच्या हिंदुत्ववादी नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त केला.

बेळगाव जिल्ह्यातील चिकोडी येथून आलेले हे संत – प.पु. पुरषोत्तम माळी महाराज यांच्या नेतृत्वात – रविवार संध्याकाळी ठाण्यातील आनंद आश्रम येथे दाखल झाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत त्यांनी जाहीर पक्षप्रवेश केला. यामध्ये सागर बागडी महाराज, नूतन धनावडे महाराज, बाळकृष्ण कांबळे महाराज, सुवेल शेट्टे महाराज, मयुर गुरव महाराज, साई पाटील महाराज, अनिकेत वरके महाराज, सुषमा खरात महाराज, दिपा फडणवीस महाराज, अरविंद शिरळकर महाराज, दादा महाराज आणि अजय घराडे महाराज यांचा समावेश होता.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी जोरदार भाष्य करत, शिवसेना ही साधू-संतांच्या विचारांशी नातं सांगणारी ताकद आहे. महाविकास आघाडीच्या काळात जे घडलं ते हिंदू समाजाला संतापजनक होतं. साधूंवर हल्ले झाले, हत्या झाल्या. त्यावेळी मौन बाळगणाऱ्यांचा आता खरा चेहरा उघडा पडतोय, असा घणाघात केला.

ते पुढे म्हणाले, राजकीय शक्तीपेक्षा आध्यात्मिक अधिष्ठान श्रेष्ठ असतं. आज जे संत शिवसेनेत आलेत, ते केवळ पक्षप्रवेश नाही तर विचारप्रवेश आहे. बाळासाहेबांच्या ह्यमराठी आणि हिंदीच्या विचारांना आम्ही पुन्हा नव्या जोमाने पुढे नेत आहोत, अशी ग्वाही त्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठावर अप्रत्यक्ष टीका करत म्हटलं, हिंदुत्व काही काळापुरतं उपयुक्त मानणाऱ्यांना जनतेने आता नाकारलं आहे. खरा हिंदुत्वाचा वारसा शिवसेना पुढे नेते आहे. या १२ मठाधिपतींच्या प्रवेशामुळे बेळगावमध्ये शिवसेनेचा पाय खोलात रुजणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. सीमाभागातील मराठी जनतेत या घटनाक्रमामुळे नवा विश्वास निर्माण होणार असल्याचे राजकीय जाणकार सांगत आहेत.

## तलावात बुडून २० वर्षीय मुलाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :

बोरिवली येथील न्यू लिंक रोडवरील झाशीची राणी लक्ष्मीबाई तलावात रविवारी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास एक २० वर्षीय युवक बुडाल्याची दुर्घटना घडली. मोहम्मद अल्ताफ शरीफ शेख (१८) असे त्या युवकाचे नाव होते. संबंधित युवकाला पोहता येत नव्हते. तलावात पडल्यानंतर पाण्यातून बाहेर येण्यासाठी त्याने अनेक प्रयत्न केले.

मात्र, तो अयशस्वी ठरला. त्यानंतर पाण्यात कोणीतरी पडल्याचे एका मच्छीमाराच्या निदर्शनास आले. त्याने तातडीने पाण्यात उतरून युवकाला बाहेर काढले आणि उपचारासाठी नजीकच्या शताब्दी रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी अल्ताफ शेख याला मृत घोषित केले.

# 'सीएसआर'च्या चांगल्या विनियोगासाठी स्वयंसेवी संस्था, कंपन्यांमध्ये समन्वय हवा : डॉ. अनिता मोहिते

## उदयगिरी सोशल फाऊंडेशनतर्फे 'सीएसआर कॉन्फरन्स २०२५'




■ महासागर प्रतिनिधी
पुणे, दि. ४ :

"समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अनेक स्वयंसेवी संस्था धडपड करीत असतात. त्यांच्या या कायार्ला व्यापक करण्यासह परिवर्तनशील विकास साकारण्यासाठी निधीची गरज असते. ही गरज भागविण्याचे काम उद्योगांची सामाजिक बांधिलकी (सीएसआर) करते. 'सीएसआर'चा चांगला विनियोग करण्यासाठी स्वयंसेवी संस्था आणि कंपन्या यांच्यातील समन्वय महत्वपूर्ण ठरतो," असे प्रतिपादन भारती अभिमत विद्यापीठातील सोशल सायन्स सेंटरच्या प्रभारी संचालिका डॉ. अनिता मोहिते यांनी केले.

उदयकाळ फाऊंडेशन आणि उदयगिरी सोशल फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सीएसआर कॉन्फरन्स २०२५' च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या कार्यक्रमात व्हर्टिव कंपनीचे वरिष्ठ संचालक डॉ. प्रशांत शिनगारे, अपिकोअर फार्मास्युटिकल्सचे उपाध्यक्ष डॉ. नंदकुमार पाटील, उदयगिरी सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष आर पी माने, संयोजक व उदयकाळ फाउंडेशनचे सचिव मयूर बागूल, आरती बागूल उपस्थित होते. विशेष बाब म्हणजे, उदयगिरी सोशल फाऊंडेशन चे उपाध्यक्ष श्री शिवशंकर मोरे,सहसचिव डॉ.नंदकुमार पाटील,हे मुंबई वरून खास या कॉन्फ्ररन्स साठी आले.कोषाध्यक्ष श्री शिवराज सुर्यवंशी व पुणे मुअ संघाचे अध्यक्ष श्री शिवाजी शिंदे तथा आय टी अभियंता श्री आकाश आदी उपस्थित होते.

सामाजिक विकास क्षेत्राची संकल्पना यावर समता शक्ती फाउंडेशनच्या संचालिका अर्चना गोमजे, प्रकल्प प्रस्ताव लेखन व निधीचे स्रोत यावर सिलॅबलच्या संस्थापिका डॉ. समीक्षा नेरुरकर, सीएसआरः कंपनीचा दृष्टीकोन यावर कल्याणी टेक्नोफोर्जचे राहुल सावंत, स्वयंसेवी संस्थांकडून कंपनीच्या अपेक्षा यावर अमडॉक्सच्या सीएसआर मॅनेजर दीप्ती घोणे कांबळे, स्वयंसेवी संस्था आणि सोशल मीडियावर विकास तिवस्कर यांनी विविध सत्रांमध्ये मार्गदर्शन केले. डॉ. अनिता मोहिते म्हणाल्या, "स्वयंसेवी संस्थांनी ग्रामीण भागात पोहोचायला हवे. तिथे अनेक कामे करण्याची गरज असून, त्यामध्ये 'सीएसआर'चे महत्व खूप आहे. विकास प्रकल्पांचे चांगले प्रस्ताव, अहवाल बनवायला पाहिजेत. कंपन्यांपर्यंत आपले काम पोहचले, तर निधी उपलब्ध होऊ शकतो. 'एमएसडब्ल्यू' झालेली व्यक्ती सोबत असल्यास हे काम अधिक प्रभावीपणे होऊ शकते."

डॉ. प्रशांत शिनगारे म्हणाले, "चांगल्या कामांसाठी कंपन्या नेहमीच निधी उपलब्ध करून देतात. समाजोपयोगी उपक्रमांना त्यांनी पाठिंबा दिल्यास शाश्वत बदल घडवता येतो. युवकांनीही पुढाकार घेत सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करावा. हे उपक्रम केवळ समस्या सोडवत नाहीत, तर समाजात आशावाद आणि प्रेरणा निर्माण करतात." डॉ. नंदकुमार पाटील म्हणाले, "कंपन्यांनी केवळ व्यवसायिक लाभ न पाहता सामाजिक जबाबदारीही पार पाडली पाहिजे. आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण यासारख्या क्षेत्रांत गुंतवणूक केल्यास समाजाचा सर्वांगीण विकास शक्य आहे. स्थानिक उपक्रमांना पाठिंबा देणे ही काळाची गरज असून अशा प्रयत्नांतून कंपन्यांची सकारात्मक प्रतिमा निर्माण होते." राम माने यांनीही मनोगत व्यक्त केले. मयूर बागुल यांनी स्वागत-प्रास्ताविकात परिषदेच्या आयोजनामागील भूमिका मांडली. केतकी पवार, वर्षा डांगे यांनी सूत्रसंचालन केले.

# सुंदर नाते मैत्रीचे

मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्री ही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रा जवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात

रोज आठवण व्हावी असे काही नाही. इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही. पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री.

अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री - पुरुष, जात - पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

महासागर

मंगळवार, दि. 5 ऑगस्ट 2025

अमरावती

पान 3

# गृहनिर्माण अभियंतासह एक मजूर एसीबीच्या जाळ्यात

**दुसऱ्या टप्प्याचा हप्ता मंजूर करण्यासाठी 5 हजारांची मागितली लाच**

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुररेल्वे (दि. 4)** - घरकुलाच्या दुसऱ्या टप्प्याचा हप्ता मंजूर करून देण्यासाठी 5 हजार रुपयांची लाच मागणाऱ्या चांदुर रेल्वे येथील ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यासह एका मजूराला अँन्टी करप्शन ब्युरो अमरावतीच्या पथकाने सोमवारी रंगेहात पकडले. ही कारवाई पंचायत समिती कार्यालय परिसरात सोमवारी सायंकाळी करण्यात आली. अटकेतील शासकीय अधिकारी राहुल रामकृष्ण नांदणे (वय 30) हा चांदुर रेल्वे पंचायत समिती ग्रामीण गृहनिर्माण अभियंता आहेत. त्यांनी तक्रारदार व त्यांच्या वडिलांच्या घरकुलाच्या दुसरूया टप्प्यासाठी प्रत्येकी 70 हजार रुपये मंजूर करण्याच्या मोबदल्यात पाच हजार रुपयांची लाच मागितली होती.

तक्रारदाराने यासंदर्भात 4 ऑगस्ट रोजी अँन्टी करप्शन कार्यालयात तक्रार दाखल केली होती. यानंतर सापळा रचण्यात आला. सापळ्यावेळी अभियंत्याने तक्रारदारास लाच रक्कम त्याच्या ओळखीच्या प्रविण भास्कराव धाडसे (वय 38, व्यवसाय मजुरी, रा. पळसखेड) यांच्याकडे द्यायला सांगितले. त्यानुसार तक्रारदाराने धाडसेकडे लाच रक्कम दिल्यावर त्यास रंगेहाथ पकडण्यात आले. या लाचप्रकरणी दोघांनाही ताब्यात घेण्यात आले असून चांदुर रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कार्यवाही पोलीस अधीक्षक मारुती जगताप, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षण अधिकारी सुनिल किनगे, निरीक्षक चित्रा मेसरे, सुजाता बन्सोड, अंमलदार प्रमोद रायपुरे, शैलेश कडू, महेंद्र साखरे व चालक सतीश किटुकले यांनी पार पाडली.



### नागरिकांनी पुढे यावे एसीबीचे आवाहन

भ्रष्टाचारास थारा देऊ नका. असे प्रकार रोखण्यासाठी नागरिकांनी धाडसाने पुढे येऊन तक्रार द्यावी, असे आवाहन लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत करण्यात आले आहे.

### संपर्क : तातडीसाठी पुढील अधिकारी

- मारुती जगताप, पोलीस अधीक्षक - 9850488788
- सचिन्द्र शिंदे, अप्पर पोलीस अधीक्षक - 9764210485
- सुनिल किनगे, पो. उपअधीक्षक - 9823111155
- कार्यालय - अँन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती
- फोन : 0721-25523557 मोबाईल- 94042996267 टोल फ्री : 1064

# 5 लाखांमध्ये दिली होती आशा तायडे यांच्या हत्येची सुपारी

## राहूलच्या प्रेयसीसह तीन मारेकरीही अटक







**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.4)** - महिला पोलिस कर्मचारी आशा राहुल तायडे यांच्या हत्येचा तपास अमरावती पोलिसांनी वेगाने पूर्ण करत राहूलच्या प्रेयसीसह आणखी तीन आरोपींना 4 ऑगस्ट रोजी अटक केली. या गुन्ह्यामागे मृत आशाच्या पती राहुल तायडेनेच पाच लाख रुपयांची सुपारी देऊन हत्येचा कट रचल्याचे उघड झाले आहे. अटक करण्यात आलेले आरोपी श्रेयस संजय महल्ले (25), ओम मोरेश्वर शेकार (18) आणि निखील रामदास टिकीले (30) हे आरोपी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असून, यापूर्वी राहुल तायडे याला पोलिसांनी अटक केली होती.

### शांत डोक्याने आखली योजना

1 ऑगस्ट रोजी सचिन बारमध्ये झालेल्या बैठकीत राहुलने पत्नीच्या खुनासाठी सुपारी देण्याचे कबूल केले. तेव्हा आशा तायडे यांच्या हत्येची योजना अत्यंत शांत डोक्याने आखण्यात आली होती. तुम्ही मारू नका, मीच मारतो, चोरी दाखवायची, असे सांगून त्याने संपूर्ण हत्येचा प्लॅन आखला. फोन पेच्या माध्यमातून श्रेयसला 37,800 रुपये आगाऊ देण्यात आले.

### पहिला प्रयत्न फसला

1 ऑगस्ट दुपारी एक वाजता राहुलने श्रेयसला फोन करून हत्या करण्याचे आदेश दिले. निखीलने गाडी पुरवली आणि तिघे मेट्रो वाईन शॉपजवळ भेटले. बिअर घेतल्यानंतर दोन शर्ट खरेदी करून ते हायवेवर गेले. मात्र, वडाळी परिसरातील गुरुकृपा कॉलनीत जात असताना नागपुरी गेट ठाण्यातील पोलीस कर्मचारी दिनेश नांदे यांनी त्यांना हटकले. त्यामुळे त्यांचा प्लॅन फसला. त्यानंतर ते रहाटगावमधील एका बारमध्ये गेले. हत्या लांबत असल्याने राहुलने श्रेयसला 50-60 वेळा फोन करून दबाव टाकला.

### शेगावला पलायन व दर्शन

हत्यानंतर आरोपी निखीलकडे जाऊन मंगळसूत्र व अंगठी दिली. नंतर तिघे शेगावला गेले, यशश्री पॅलेस हॉटेलमध्ये थांबले आणि 2 ऑगस्ट रोजी गजानन महाराजांचे दर्शन घेतले. अमरावतीला परत येऊन माहुली जहागिर येथील रेवती बारमध्ये दारू प्यायली. त्यानंतर ओम व श्रेयस एका वाडीत लपले.

### राहुलची प्रेयसी अटक

या प्रकरणात नवीन धागा समोर आला आहे. पोलिसांनी मुख्य आरोपी राहुलच्या प्रेयसीलाही अटक केली आहे. तिच्या चौकशीतून प्रेमसंबंध, मत्सर आणि हत्येच्या गुंतागुंतीच्या पार्श्वभूमीबाबत अनेक अनुत्तरित प्रश्नांची उकल होण्याची शक्यता आहे.

### झोपेतच दाबला गळा

सायंकाळी 5.50 वाजता श्रेयस आणि ओम पुन्हा आशा तायडेंच्या घराजवळ पोहोचले. त्यावेळी राहुल जवळच असलेल्या ग्राउंडवर थांबला होता. हे दोघे घरात मागून शिरले. आशा झोपलेल्या असताना श्रेयसने त्यांच्यावर उडी घेतली आणि गळा दाबण्यास सुरुवात केली. प्रतिकार करताना आशा जमिनीवर कोसळल्या व डोक्याला मार लागला. त्यानंतर दोघांनी पूर्ण ताकदीने गळा आवळून हत्या केली. हत्येनंतर मंगळसूत्र आणि अंगठी काढून ते पळून गेले. आशाचा मुलगा घरी आला तेव्हा त्याने दोन जणांना पळताना पाहिले.

### निखील ने करवून दिली सुपारी किलरची ओळख

तपासात उघड झाले की, राहुल तायडे हा निखील टिकीलेच्या ओळखीतील होता. मे महिन्यात निखीलने राहुलची ओळख वडाळीतील चकला मैदानात गांजा ओढणारूया श्रेयस आणि ओमशी करून दिली. राहुलला पत्नी आशा हिच्या चरित्रावर संशय होता आणि तिने त्याला धोका दिल्याचा गैरसमज त्याला झाला. या कारणावरून राहुलने तिचा खून करण्याचा कट रचला. त्यासाठी त्याने श्रेयस, ओम व निखील यांना चार ते पाच लाख रुपयांची सुपारी देण्याचे ठरवले.

### पोलिसांचे यश व रिवार्ड

ही कारवाई पोलिस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहायक आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखा युनिट 2 चे निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली झाली. एपीआय महेश इंगोले यांच्या पथकाने उत्कृष्ट तपास करून आरोपींना गजाआड केले. हे पथक रिवार्डचे मानकरी ठरले आहे.

### सीसीटीव्ही आणि डिजिटल पुरावे निर्णायक

पोलिसांनी विविध परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, कॉल रेकॉर्ड्स आणि फोन पे व्यवहार तपासून आरोपींचा शोध लावला. ऑगस्ट रोजी ओम व श्रेयस माहुली जहागिर येथील शेतातून पकडले गेले, तर निखील टिकीले 4 ऑगस्ट रोजी वाशिम येथून अटक झाला.

# अल्पवयीन मुलीशी लग्न करुन केले गर्भवती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.4)**- शिरजगाव कसबा पोलिस स्टेशन हद्दीत एका 22 वर्षीय युवकाने अल्पवयीन मुलीचे अपहरण करून मंदिरात लग्न लावले. यामुळे ती मुलगी गर्भवती झाली आणि तिने एका बाळीस जन्म दिला. रुग्णालयातील प्रशासनाने आईचे वय कमी असल्याचे लक्षात आल्यावर पोलिसांना माहिती दिली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी पतीविरुद्ध बलात्काराचा गुन्हा दाखल केला. 22 नोव्हेंबर 2023 रोजी आरोपी युवकाने 17 वर्षीय 9 महिन्यांच्या मुलीला शाळेतून मोटारसायकलवरून अपहरण केले. त्यानंतर लखनवाडी येथील एका मंदिरात जाऊन मंगळसूत्र बांधून तिच्याशी लग्न केले. दोघे एकत्र राहू लागले आणि आरोपीने अनेकवेळा तिच्याशी जबरदस्तीने शारीरिक संबंध स्थापित केले. याचा परिणाम म्हणून मुलगी गर्भवती झाली आणि नंतर तिला जिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले. रुग्णालयातील प्रशासनाने तिचे आधार कार्ड तपासून आई अल्पवयीन असल्याचे नोंदवले. ही माहिती गाडगेनगर पोलिसांना देण्यात आल्यानंतर पीडितेच्या पतीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 376 (लैंगिक अत्याचार) आणि पोस्को कायद्याखाली गुन्हा नोंदविण्यात आला.

# शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर अंजनगाव पोलिसांचा छापा



**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगांव सुर्जी, (दि. 4)** : अंजनगाव पोलिसांनी शिरजगाव रोडवरील एका शेतात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर छापा टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत तब्बल 15 जुगारींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून 3 लाख 31 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जप्तीमध्ये रोख 21,100 रुपये, पत्ते आणि पाच मोटारसायकली यांचा समावेश आहे.

### 15 जण अटकेत

प्रवीण भरत तायडे (वय 43, हंतोडा), संतोष चंपतराव इंगळे (42, भीमनगर), आकाश सहदेवराव राऊत (23, मातंगपुरा), रवींद्र काशिनाथ इंगळे (35, तहसील रोड), रोहित अनिल सपकाळ (21, सलीम नगर), ऋषिकेशराव राजेंद्र (21, सलीम नगर), प्रवीण राजेंद्र (23, मातंगपुरा), विजयकर (24, शहापुरा), राजू प्रल्हाद कोतेकर (30, दोरपुरा), शेख जाकीर शेख इब्राहिम (38, संघाई शाळेजवळ), मनोज अशोक गोर (27, भोईपुरा), दीपक जगदीश कनोजिया (30, संघाई शाळेजवळ), शरीफ खान शफी खान (47, भालदारपुरा), श्रीकृष्ण मोरेवाडा (24, भोईपुरा), राहुल प्रकाश इंगळे (26, पणताई) यांना अटक करण्यात आले.

3 ऑगस्ट रोजी अंजनगाव पोलिस स्टेशनचे पथक गस्त घालत असताना, प्रेम रॉय यांच्या शेतात जुगार अड्डा सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पंचासह छापा टाकण्यात आले असून जुगार खेळताना आढळून आले.

ही कारवाई पोलीस स्टेशन प्रभारी सूरज तेलगोटे यांच्या नेतृत्वात, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अतिरिक्त पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत रवी राठोड, आकाश रंगारी, अमित घाटे, शुभम मार्कंड, प्रमोद चव्हाण, युवराज सोळंके, मोहसीन पठाण, तसेच चालक अक्षय शेळके आणि विलास रावते यांचा सहभाग होता.

# शहरात 300 किलोहून अधिक प्लास्टिक जप्त

**गुलिस्तान नगर, महावीर कॉम्प्लेक्स व मोरबागमध्ये मनपाची धडक कारवाई | नियम तोडल्यास कठोर कारवाईचा इशारा**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 4)** - शासनाच्या प्लास्टिकबंदी धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने आज शहरातील तीन प्रमुख ठिकाणी मोठी धडक कारवाई करत तब्बल 600 किलोहून अधिक प्रतिबंधित प्लास्टिक साहित्य जप्त केले. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर यांच्या मार्गदर्शनात ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या या कारवाईत गुलिस्तान नगर, महावीर कॉम्प्लेक्स आणि मोरबाग परिसरातील दुकानांवर छापे टाकण्यात आले.



कारवाई दरम्यान खालील प्रमाणे प्लास्टिक साहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये अब्दुल सलाम अब्दुल सत्तार (रा. गुलिस्तान नगर) याच्याकडून 15 पोते (अंदाजे 50 किलो), पवन कुकरेजा (महावीर मार्केट) याच्याकडून 19 पोते (अंदाजे 300 किलो) व रतन खत्री (मोरबाग) यांच्याकडून 32 पोते ( अंदाजे 250 किलो) प्लास्टीक जप्त करण्यात आलेले आहे. सर्व साहित्य पुढील तपासणीसाठी विभागात जमा करण्यात आले असून, संबंधितांवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे. महानगरपालिकेने नागरिक आणि व्यापारूयांना पुन्हा एकदा पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्याचे आवाहन केले आहे.

यासोबतच, प्लास्टिक बंदीचे उल्लंघन केल्यास भविष्यात आणखी कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. या कारवाईदरम्यान वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय जाधव, पशुचिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे, पोलिस संयोनी इमरान नायकवडे, जितेंद्र पुंडसे, भूषण पुसतकर, दीपक खडेकार, उदय चव्हाण, योगेश कोल्हे, संतोष केंद्रे, विकी जेधे, प्रशांत गावनेर आणि मनपाचे इतर कर्मचारी उपस्थित होते.

### तरुणावर चाकूने हल्ला

**अमरावती-** भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या तरुणावरच चाकूने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. या प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलीम खान इमाम खान (रा. नागपुरी गेट परिसर) हा आपल्या ओळखीच्या नईम याचे भांडण थांबवण्यासाठी गेला होता. दरम्यान, नईमने चाकूने हल्ला करून कलीमला गंभीर जखमी केले. त्याचप्रमाणे वसीम खोबरा आणि एका महिलेलाही कलीमला मारहाण केली. या प्रकरणी कलीम खानने दिलेल्या तक्रारीनंतर पोलिसांनी नईम, वसीम खोबरा आणि संबंधित महिलेविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# अंजनगाव सुर्जी नगर पालिका आपले दुर्गंधीयुक्त स्वागत करित आहे!

## शहराच्या सुरवातीला कचऱ्यांचे ढिगारे

**प्रविण बोके**

**अंजनगाव सुर्जी, (दि.4)**- अंजनगाव सुर्जी नगरपालीकेच्या आरोग्य विभागाचे प्रताप दिवसेदिवस वाढत चालले असुन प्रंचंड अनियमीतता व गोंधळ असणाया आरोग्य विभागाने शहरातील नागरिकांकडुन जमा झालेला घनकचरा व्यवस्थापनात अनियमीतता केल्याने दोन्ही कचरा डेपो(डंपींग यार्ड) वर कर्च्याचे डोंगर साचलेले आहेत. अंजनगाव-अकोट या राज्य महामार्गावर डंपींग यार्डमधील कचऱ्यांचे ढीगारे महामार्गावर आल्याने शहरात प्रवेश करणाया अभ्यांगताचे स्वागतच कर्च्याचे ढिगारे करत असल्याने शहराच्या नामुष्कित आणखी भर पडली आहे.

सरकारच्या मार्गदर्शक सूचना आणि राज्य शासनाच्या निर्णयानुसार स्वच्छ भारत अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी विशेष निधी उपलब्ध करून दिला जातो. त्या अंतर्गत पालिकेच्या आरोग्य विभागामार्फत सर्वाधिक खर्च स्वच्छतेवर केला जातो. विभागाचे यावरील अंदाजपत्रक दरवर्षी साधारणपणे दोन ते तीन कोटी रुपये असते. साहजिकच स्वच्छतेसंबंधी सर्व कंत्राटे व कामकाज हे सर्वाधिक बजेटचे असते.

मात्र, या कंत्राटामध्ये प्रचंड प्रमाणात अनियमितता, कामकाजावर कंत्राटदाराचे निरंकुश वर्चस्व, नियमभंग आणि अधिकारूयांच्या दबावाखाली कामकाज केल्यामुळे पालिकेच्या दोन्ही डंपिंग यार्डवर मानवनिर्मित कचरूयाचे कृत्रिम डोंगर तयार झालेले आहेत. यातील राज्य महामार्गावरील अकोट-अंजनगाव मार्गावरील कचरा डेपो पालिकेच्या अनियमित गैरकारभारामुळे ओव्हर फ्लो झाला आहे.



यामुळे अंजनगाव सुर्जी येथून अकोटकडे जाणारूया प्रवाशांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. कारण रस्त्यावर आलेले कचरूयाचे ढिगारे प्रवाशांसाठी धोकादायक ठरत आहेत. असह्य दुर्गंधी आणि पेटत्या अवशेषांच्या धुरामुळे नागरिकांना नरकयातनेचा अनुभव येतो. नाकावर रुमाल धरून अडथळे पार करत प्रवास करावा लागत आहे. कचरा डेपोजवळ अपघात होण्याची शक्यता देखील वाढली आहे.

स्वच्छ भारत मिशनवर नगर परिषदेकडून करोडो रुपये खर्चूनही कचरा व्यवस्थापन संबंधीचे नियम व अटी तसेच शासनाने घालून दिलेल्या दिशा-निर्देशांचे उल्लंघन होत आहे. कचरूयाचे डोंगर कमी होत नसल्याने झालेल्या कोटी रुपयांच्या खर्चाचे काय झाले, त्यावर कुणी हात साफ केला का, असे एक ना अनेक प्रश्न नागरिक विचारत आहेत. पालिकेने शहरात येणारूया पाहुण्यांचे स्वागत करण्यासाठीच हे कचरूयाचे कृत्रिम पर्वत तयार केले आहेत का, असा सवालही निर्माण झाला आहे.

### प्रशासनाच्या झोपेवर प्रश्नचिन्ह

अंजनगाव सुर्जीतील या स्थितीवर नागरिकांकडून प्रशासनावर गंभीर आरोप होत आहेत. नगर पालिकेच्या कारभारातील गोंधळ आणि अनियमितता वारंवार समोर येत असूनही जिल्हा प्रशासन मौन बाळगून आहे. नागरिकांचा सवाल आहे, कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनाला केव्हा जाग येणार? शहराच्या प्रतिष्ठेवर कचऱ्याचे ढिगारे आणि दुर्गंधीचा आणखी एक काळा डाग लागला आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### करोडो खर्चूनही परिणाम शून्य

स्वच्छ भारत अभियानासाठी केंद्र व राज्य सरकारकडून विशेष निधी उपलब्ध करून दिला जातो. नगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे वार्षिक अंदाजपत्रक दोन ते तीन कोटी रुपये असते. तरीही कंत्राटदारांच्या निरंकुश वर्चस्वामुळे व अधिकारूयांच्या दुर्लक्षामुळे कचरा व्यवस्थापन कोलमडले आहे. कचरा डेपोवर कृत्रिम डोंगर उभे राहिले आहेत. नागरिकांचा सवाल आहे, करोडो रुपयांचा खर्च कुठे मुरला?

### कचरा विलगीकरण युनिट फक्त कागदावरच

कचरा विलगीकरणासाठी नगरपालिकेने लाखो रुपयांचा खर्च करून युनिट खरेदी केले. मात्र, हे युनिट प्रत्यक्षात वापरले जात नाही. निष्क्रिय झालेल्या या संयंत्राला गंज चढला असून ते फक्त कागदोपत्री शोभेचे ठरले आहे. स्वच्छ भारत मिशनअंतर्गत घालण्यात आलेल्या अटी व दिशा-निर्देशांचे उल्लंघन होत असताना, संबंधित अधिकारूयांकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. कचरूयाचे ढिगारे कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढत असल्याने स्थानिक नागरिकांचा संताप वाढला आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शिबू सोरेन : दिशाम गुरू ते मुख्यमंत्री

झारखंडचे माजी मुख्यमंत्री आणि दिशाम गुरु म्हणून प्रसिद्ध असलेले शिबू सोरेन आता या जगात नाहीत. ते ८१ वर्षांचे होते. गेल्या दीड महिन्यापासून ते दिल्लीतील सर गंगाराम रुग्णालयात दाखल होते. त्यांना ब्रेन स्ट्रोक आला होता आणि त्यांच्या शरीराच्या डाव्या भागाला अर्धांगवायू झाला होता. आदिवासींच्या हक्कांसाठी आणि वेगळ्या झारखंडसाठी मोहीम राबवली, नंतर राजकारणात प्रवेश केला. कालांतराने ते मुख्यमंत्री झाले.

----------------

शिबू सोरेन यांचा जन्म ११ जानेवारी १९४४ रोजी गोला ब्लॉकमधील नेमरा गावात झाला. त्यावेळी झारखंड वेगळे झाले नव्हते. नेमरा बिहारच्या हजारीबाग जिल्ह्यात होते. शिबू हे चार भावंडांमध्ये दुसरे होते. त्यांचे वडील सोबरन सोरेन हे गांधीवादी शिक्षक होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता.

शिबू सोरेन यांची बालपणी दोन नावे होती - शिवलाल आणि शिवचरण. हायस्कूलमध्ये असताना शिबू यांना वसतिगृहात जावे लागले. २७ नोव्हेंबर १९५७ रोजी त्यांना वसतिगृहात बातमी मिळाली की त्यांच्या वडिलांची हत्या झाली आहे. शिबू यांचे वडील आदिवासींना सावकारांविरुद्ध जागरूक करायचे.

ज्येष्ठ पत्रकार अनुज कुमार सिन्हा शिबू सोरेन यांच्या ' दिशाम गुरुः शिबू सोरेन' या चरित्रात लिहितात, वडिलांच्या हत्येनंतर, १३ वर्षांच्या शिबूचा अभ्यासातील रस कमी झाला. त्याला माहित होते की सावकारांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवल्याबद्दल त्याच्या वडिलांना मरावे लागले.

हा तो काळ होता जेव्हा गोला आणि त्याच्या आसपासच्या भागात सावकारांची दहशत होती. सावकार प्रथम गावकऱ्यांना पैसे उधार द्यायचे आणि नंतर ५००% पर्यंत व्याज आकारायचे. जर पैसे दिले नाहीत तर ते जमीन ताब्यात घ्यायचे. गावकऱ्यांनी स्वतःच्या शेतात भात लावल्यानंतर, सावकार जबरदस्तीने अर्ध्याहून अधिक जमीन काढून घ्यायचे.

शिबू यांना समजले होते की शिक्षणापेक्षा आदिवासी समाजाला सावकारांविरुद्ध एकत्र करणे जास्त महत्त्वाचे आहे. त्यांनी व्याजदार सावकारांविरुद्ध काम करण्यास सुरुवात केली. सावकारांनी शिबूला मार्गावरून हटवण्यासाठी लोकांना कामावर ठेवले. त्या काळात शिबू सोरेन आदिवासींना जागरूक करण्यासाठी सायकलवरून गावोगावी जात असत.

एके दिवशी शिबू बाराकर नदीजवळून जात असताना सावकारांच्या गुंडांनी त्यांना घेरले. पावसाळा सुरू होता. बाराकर नदीला पूर आला होता. शिबूला समजले की आता जगणे कठीण आहे. दोनदा विचार न करता त्यांनी वेग वाढवला आणि बाईकसह नदीत उडी मारली. सर्वांना वाटले की त्याचा मृत्यू निश्चित आहे, परंतु काही वेळाने शिबू नदीच्या पलीकडे पोहत गेले. लोकांना हा एक दैवी चमत्कार वाटला. आदिवासींनी शिबूला 'दिशाम गुरु' म्हणायला सुरुवात केली. संथालीमध्ये, दिशाम गुरु म्हणजे देशाचा गुरु.

त्या काळात गोमती नदीवर गोला-मुरी रस्त्यावर एक पूल बांधला जात होता. गोलातील दाभाटू येथील रहिवासी विशू महातो यांना सावकार त्यांची जमीन बळकावण्यासाठी त्रास देत होते. शिबूने विशूला मदत करण्याचा निर्णय घेतला.

शिबू यांनी सावकाराच्या गुंडांना सांगितले की विशूला त्रास देऊ नका नाहीतर परिणाम चांगले होणार नाहीत. पहिल्यांदाच कोणीतरी गुंडांना धमकी दिली होती. दुसऱ्यांदा ते विशूला त्रास देण्यासाठी आले नाहीत. यामुळे शिबू सोरेनचे मनोबल वाढले. लोक शिबू सोरेनला पाठिंबा देऊ लागले. त्यांना या लहान मुलामध्ये एक मसीहा दिसला जो त्यांना सावकारांपासून मुक्त करू शकतो.

शिबू यांचा प्रभाव वाढत होता. त्यांचे सहकारी म्हणत होते की जर आमची व्यक्ती राजकारणात असेल तर आमचा आवाज ऐकला जाईल. शिबू सोरेन निवडणूक लढवतील असे ठरले. शिबू यांनी बारलंगा पंचायतीच्या मुखिया पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. अधिकाऱ्यांच्या संगनमतामुळे शिबू यांचा पराभव झाल्याचे सांगितले जाते.

आदिवासी त्यांच्या स्वतःच्या शेतात मजुरांसारखे काम करत होते. शिबू यांनी लोकांना धनुष्यबाण उचलण्यास आणि जबरदस्तीने भात तोडण्यास सांगितले. आम्हाला कोण रोखते ते आपण पाहू. शिबू सोरेन यांच्या या आवाहनावर लोकांनी त्यांना पाठिंबा देण्यास सुरुवात केली. शिबू सोरेन त्यांच्या समर्थकांच्या मदतीने 'भात तोड' मोहीम सुरू केली.

बारलंगा पंचायतीमध्ये, ज्या सावकारांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या होत्या आणि तिथे शेती करत होते, ते शिबू त्यांच्या शेतातून जबरदस्तीने भात कापत असत. धनुष्यबाण असलेले तरुण ज्या शेतात भात कापायचे त्या शेतांभोवती उभे राहत असत. महिला भात कापत. ते पीक गावकऱ्यांमध्ये वाटले जात असे. यामुळे शिबू सोरेन यांची लोकप्रियता वाढली.

विनोद बाबूंनी सीपीआय सोडली होती. ते आता शिबूसोबत होते. आदिवासींना एका राजकीय पक्षाची गरज आहे हे त्यांना समजले होते. ४ फेब्रुवारी १९७२ रोजी, शिबू सोरेन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी धनबाद येथील विनोद बाबूंच्या निवासस्थानी एक बैठक घेतली.

त्यात शिबू सोरेन, विनोद बाबू, एके राय, प्रेम प्रकाश हेन्त्रम, कात्रसचे माजी राजा पूर्णेंदू नारायण सिंह, शिवा महातो, जादू महातो, शक्तीनाथ महातो, राज किशोर महातो, गोविंद महतो आदी उपस्थित होते.

बैठकीत सोनोट संथाल समाज आणि शिवाजी समाज यांचे विलीनीकरण करून एक नवीन संघटना स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीत नवीन संघटनेच्या नावावर चर्चा झाली. अनेक नावे सुचवण्यात आली. नवीन संघटनेचे नाव 'झारखंड मुक्ती मोर्चा' असे ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

१९७३ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाच्या स्थापना रॅलीनंतर, मोर्चा बराच सक्रिय आणि प्रसिद्ध झाला होता. सावकारांचे धान जबरदस्तीने कापल्यानंतर, शिबूवर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले. पोलिस त्यांचा सक्रियपणे शोध घेत होते. अनेक ठिकाणी छापे टाकले जात होते.

४ फेब्रुवारी रोजी झामुमोचा स्थापना दिन येत होता. अध्यक्ष विनोद बिहारी तुरुंगात होते. इतक्या केसेसमुळे शिबूही येणार नाहीत असे सर्वांना वाटत होते. तरीही, झामुमोचा स्थापना दिन साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. धनबादमधील कार्यक्रमस्थळी मोठी गर्दी जमली होती.

शिबूला अटक करण्यासाठी प्रत्येक पोलिस तैनात करण्यात आले होते. काही वेळाने शिबू सोरेन पोलिसांना चकमा देऊन स्टेजवर आले. हजारो लोकांनी त्यांना घेरले. पोलिस स्टेजवर पोहोचू शकले नाहीत. भाषणानंतर शिबू यांना अटक करतील असे पोलिसांना वाटले. पोलिसांनी शिबू यांचा शोध सुरू ठेवला, पण भाषणानंतर ते गायब झाले.

केबी सक्सेना धनबादचे नवे उपायुक्त म्हणून आले होते. त्यांना शिबू सोरेन यांना अटक करण्याची जबाबदारी देण्यात आली होती. सुरुवातीला सक्सेना यांनी शिबूशी सामना करण्यासाठी कडक योजना आखली. शिबू आदिवासींच्या



हितासाठी काम करत असल्याचे त्यांना कळताच त्यांनी शिबूबद्दलचा आपला दृष्टिकोन बदलला.

सक्सेना खूप निर्भय होते. एकदा ते कसेतरी जंगलात शिबू यांच्या लपण्याच्या ठिकाणी पोहोचले. शेकडो आदिवासी त्यांच्या सुरक्षेसाठी धनुष्यबाण घेऊन शिबू यांचे रक्षण करत होते. शिबूजवळ येऊन सक्सेना म्हणाले, मी धनबादचा नवीन डीसी आहे, मी तुम्हाला भेटायला आलो आहे. शिबू यांनी सक्सेनाला त्यांच्या शेजारी असलेल्या खाटेवर बसवले.

सक्सेना यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले. केबी सक्सेना शिबू सोरेन यांना म्हणाले, तुम्हाला पाहिल्यानंतर एक गोष्ट स्पष्ट होते की तुम्ही आदिवासींचे मसीहा आहात, पण तुमची लढण्याची पद्धत चुकीची आहे. तुम्ही कायद्यासमोर शरण जावे, अन्यथा एक दिवस तुम्ही पोलिसांच्या गोळ्यांचे बळी व्हाल.

पुढच्या वेळी, एसपी आणि काही इतर अधिकारीही केबी सक्सेनासोबत आले. त्या जागेचे रक्षण करणाऱ्या आदिवासींना अटक झाल्यास हल्ला करण्याचे निर्देश देण्यात आले, अन्यथा नाही. सक्सेना आले, पण अटक झाली नाही. तिथे एक मोठी बैठक झाली, ज्यामध्ये २५ हजार आदिवासी सहभागी झाले. सक्सेना म्हणाले की शिबू हे आदिवासींचा मसीहा आहे. ही बातमी संपूर्ण राज्यात पसरली.

एके दिवशी शिबूला पोलिस स्टेशनला येण्यास सांगण्यात आले. ही अशी वेळ होती जेव्हा कोणीही असे करण्याचे धाडस करू शकत नव्हते. शिबूला सांगण्यात आले की सीएम साहेब तुमच्याशी पोलिस स्टेशनमधूनच बोलतील. त्यानंतर तुमच्यावरील खटले रद्द केले जातील.

तो सप्टेंबर १९७५ चा काळ होता. एके दिवशी डीसी शिबू यांच्या घरी पोहोचले. त्यांना सांगण्यात आले की शिबूला काही दिवस तुरुंगात जावे लागेल जेणेकरून परिस्थिती सुधारेल. प्रशासनाने समर्थकांना आश्वासन दिले की काहीही चुकीचे होणार नाही. हळूहळू सर्व खटले बंद केले जातील, परंतु प्रथम शिबू यांना तुरुंगात जावे लागेल. अशाप्रकारे शिबू सोरेन यांनी आत्मसमर्पण केले.

शिबू आणि त्यांचे साथीदार बरेच दिवस धनबाद तुरुंगात राहिले. त्यांच्या सुविधांची काळजी स्वतः डीसी घेत होते. एके दिवशी शिबू यांना बोकारो येथे नेण्यात आले. तिथे शिबू आणि मुख्यमंत्री जगन्नाथ मिश्रा यांच्यात चर्चा झाली.

मुख्यमंत्र्यांनी शिबू यांना सांगितले की हळूहळू खटले मागे घेतले जात आहेत. तुम्ही जामिनासाठी अर्ज करा, प्रशासन त्याला विरोध करणार नाही. तुम्हाला तुरुंगातून सोडण्यात येईल. काही दिवसांनी शिबू आणि त्यांचे साथीदार तुरुंगातून बाहेर आले.

जुलै २००० मध्ये संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू होते. या अधिवेशनात सरकारने झारखंड विधेयक सभागृहात मांडावे अशी शिबू सोरेन यांची इच्छा होती. दबाव निर्माण करण्यासाठी शिबू यांनी दिल्लीत मोठी रॅली आणि निदर्शने करण्याचा निर्णय घेतला. झारखंडमधील शेकडो लोक आणि सर्व पक्षांचे मोठे नेते दिल्लीत पोहोचले.

२५ जुलै रोजी दिल्लीतील शिबू यांच्या निवासस्थानापासून एक निषेध रॅली काढण्यात आली. जंतरमंतरमार्गे संसद भवनाकडे रॅली जाऊ लागली तेव्हा पोलिस आणि सुरक्षा यंत्रणांनी ती रोखली. जिथे रॅली थांबवण्यात आली तिथे धरणे सुरू झाले आणि शिबू सोरेन म्हणाले की जर झारखंड विधेयक मंजूर झाले नाही तर झारखंडमधून संपूर्ण देशाला कोळसा आणि इतर खनिजांचा पुरवठा होऊ दिला जाणार नाही.

केंद्रातील अटलबिहारी सरकार अडचणीत आले. दुपारी गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी यांनी संसदेत झारखंड राज्य निर्मितीचे विधेयक सादर केले. झारखंड विधेयक सादर होताच, ओडिशाच्या खासदारांनी सर्वप्रथम निषेध नोंदवला, बिजू जनता दल देखील झारखंड मुक्ती मोर्चाप्रमाणे एनडीएचा सदस्य होता.

बीजेडी खासदारांनी सांगितले की सराईकेला-खरसावन ओडिशाला द्यावे. खासदारांना पटवून देण्याचे प्रयत्न केले गेले, परंतु ते सहमत होण्यास तयार नव्हते. येथे शिबू सोरेन देखील ठाम होते. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की जर तुम्ही सराईकेला-खरसावनचे गाणे गाणे थांबवले नाही तर आम्ही ओडिशाच्या मयूरभंज, केओंझार आणि सुंदरगडचा झारखंडमध्ये समावेश करण्याचा मुद्दा देखील उपस्थित करू. अखेर २ ऑगस्ट रोजी विधेयक मंजूर झाले आणि अशा प्रकारे झारखंडचा जन्म झाला.

२३ जानेवारी १९७५ रोजी चिरुडीह येथे आदिवासी आणि सावकार आणि त्यांच्या समर्थकांमध्ये संघर्ष झाला. यामध्ये दहाहून अधिक लोक मारले गेले. शिबू सोरेन यांनी त्यांना चिथावणी दिल्याचा आरोप करण्यात आला. न्यायालयात खटला सुरू होता. त्यानंतर जामतारा येथील न्यायालयाने या प्रकरणात ६ सप्टेंबर १९८६ रोजी शिबूला न्यायालयात शरण येण्याचे आदेश दिले होते.

२००४ मध्ये अचानक हे प्रकरण उघडकीस आले. राज्यात भाजपचे सरकार होते आणि अर्जुन मुंडा मुख्यमंत्री होते. शिबू यांनी प्रत्युत्तर दिले, 'मी वर्षानुवर्षे आमदार, खासदार आणि मंत्री आहे, मग मी फरार कसा राहू शकतो?

२००४ मध्ये न्यायालयाने शिबू यांच्याविरुद्ध वॉरंट जारी केले होते. त्यावेळी ते कोळसा मंत्री होते. वॉरंट जारी झाल्यानंतर, पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या आदेशानुसार शिबू यांनी राजीनामा दिला.

२ मार्च २००५ रोजी शिबू सोरेन पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले, परंतु बहुमत सिद्ध करू न शकल्यामुळे त्यांना दहा दिवसांत राजीनामा द्यावा लागला. २७ ऑगस्ट २००८ रोजी, शिबू सोरेन दुसऱ्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री झाले. यावेळी ते आमदार नव्हते. त्यामुळे त्यांना निवडणूक जिंकून सहा महिन्यांत विधानसभेचे सदस्य व्हावे लागले.

पाच महिन्यांनंतर, २००९ मध्ये पोटनिवडणूक झाली. शिबूला एका सुरक्षित जागेची आवश्यकता होती, परंतु कोणीही त्यांच्यासाठी जागा सोडण्यास तयार नव्हते. जागा सोडण्यास तयार असलेले आमदार कणखर होते.

तामार विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक जाहीर झाली. युपीएने युतीच्या वतीने शिबू यांना उमेदवारी दिली, परंतु शिबू तेथून निवडणूक लढवू इच्छित नव्हते. शिबू यांना माहित होते की तामार हा मुंडा बहुल भाग आहे. शिबू तिथे अडचणी येऊ शकतात. सक्तीमुळे शिबू सोरेन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. झारखंड पक्षाचे राजा पीटर त्यांचे विरोधक म्हणून रिंगणात होते.

८ जानेवारी २००९ रोजी निकाल आले तेव्हा मुख्यमंत्री शिबू सोरेन यांचा पोटनिवडणुकीत सुमारे ९ हजार मतांनी पराभव झाला. शेवटी त्यांना राजीनामा द्यावा लागला.

त्यांच्या तीन कार्यकाळात, शिबू सोरेन यांना फक्त १० महिने आणि १० दिवसांसाठी राज्याचा कार्यभार सांभाळण्याची संधी मिळाली. शिबू सोरेन पहिल्यांदा २ मार्च २००५ रोजी झारखंडच्या मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीवर बसले. ते २ मार्च ते १२ मार्च या काळात फक्त १० दिवसांसाठी मुख्यमंत्री झाले.

यानंतर, २८ ऑगस्ट २००८ रोजी शिबू सोरेन दुसऱ्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री झाले. यावेळी त्यांना पाच महिन्यांसाठी मुख्यमंत्रिपदाची खुर्चीवर बसण्याची संधी मिळाली. १८ जानेवारी २००९ रोजी त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला.

त्यानंतर ३० डिसेंबर २००९ रोजी शिबू सोरेन तिसऱ्यांदा झारखंडचे मुख्यमंत्री झाले. यावेळी पुन्हा त्यांना फक्त पाच महिने मुख्यमंत्रिपदाची संधी मिळाली. ३१ मे २००९ रोजी त्यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. आदिवासींचे हक्क, त्यांचे अधिकारासाठी तसेच शोषणाविरूद्ध शिबू यांनी आयुष्य वेचले. आज हा संघर्ष कायमचा थांबला आहे.

■ ■ ■

# विशेष सखोल फेरतपासणी मधील त्रुटी !

बिहारमध्ये निवडणूक आयोगाकडून सध्या " स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन " ( एसआयआर ) ची मोहीम सुरू आहे. अपेक्षेनुसार ती वादात सापडली आहे. निवडणूक आयोगाने नुकतेच जाहीर केले आहे की एसआय आर अंतर्गत मतदार याद्यांच्या छाननीत २२ लाख मतदार मृत आढळले, ३६ लाख मतदारांनी एकतर कायमस्वरूपी दुसरीकडे स्थलांतर केले आहे किंवा त्यांचा ठावठिकाणा लागला नाही.७ लाख मतदारांनी आपले नाव एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदवले आहे.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की जे मतदार मृत्यू पावले आहेत, मतदार कायमस्वरूपी स्थलांतरित झाले आहेत आणि ज्या मतदारांनी आपले नाव एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदवले आहे, त्यांना मतदार याद्यांतून बाहेर करण्याचे काम करून, निवडणुक आयोग आपले घटनात्मक कर्तव्य पार पाडत आहे.

विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) मोहिमेबाबत एका संस्थेने केलेल्या सर्वेक्षणात बऱ्याच त्रुटी समोर आल्या आहेत. या सर्वेक्षणानुसार इतक्या कमी वेळेत लाखो कागदपत्रे अपलोड करणे आणि व्हेरिफाय करणे अतिशय अवघड काम आहे.



अभय गोखले

सध्या बिहारमध्ये काही ठिकाणी पूरपरिस्थिती आहे. खेडेगावातील शेतकरी शेतीच्या कामात व्यस्त आहेत.ते या खडतर कामासाठी वेळ कसा काढणार. ही प्रक्रिया राबवणाऱ्या बूथ लेव्हल ऑफिसर्सना (बीएलओ) व्यवस्थितपणे प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. त्यांच्यावर कमी वेळेत मोठे टार्गेट पूर्ण करण्याचे दडपण असल्याने ते बऱ्याच वेळा आवश्यक असलेल्या कागदपत्रांशिवाय फॉर्म अपलोड करत आहेत. फॉर्म घाईघाईने भरले जात आहेत. त्यावर फक्त आधार नंबर आणि मोबाईल नंबरचा उल्लेख केला जात आहे.बऱ्याच फॉर्मवर लोकांनी सह्याही केलेल्या नाहीत.

लोकांनी फॉर्म सबमिट केल्यानंतर त्यांना पावती मिळत नाही.या सर्वेक्षणात बऱ्याच लोकांनी सांगितले की, त्यांना आपला कामधंदा सोडून फॉर्मच्या पाठीमागे धावावे लागत आहे. काही लोकांनी तक्रार केली की फॉर्म भरून घेण्यासाठी त्यांना शंभर रुपये मोजावे लागत आहेत. निवडणूक आयोगाने जी अकरा कागदपत्रे पुरावा म्हणून नमूद केली आहेत, त्यातील एकही कागदपत्र काही जणांकडे उपलब्ध नाही.

भारत जोडो अभियान या संघटनेतर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले की ३७ टक्के लोकांकडे आवश्यक ती कागदपत्रे नाहीत. याचा अर्थ एकूण मतदारांच्या जवळजवळ एक तृतीयांश मतदारांकडे आवश्यक ती कागदपत्रे नसल्याने, त्यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. संघटनेच्या मतानुसार इलेक्टोरल रजिस्ट्रेशन ऑफिसर्सना विशेष सखोल फेरतपासणी मोहिमेद्वारे मतदारांची नावे वगळण्याचा किंवा समाविष्ट करण्याचा अधिकार देण्यात आला असून त्याचा गैरवापर होऊ शकतो.

या मोहिमेत विवाहित महिलांना सर्वात जास्त त्रास सहन करावा लागत आहे. कारण त्यांना त्यांच्या आई वडिलांकडून कागदपत्रे आणण्यास सांगितले जात आहे. ही कागदपत्रे जमा करण्यात अनेक अडचणी येत आहेत. ही सर्व परिस्थिती लक्षात घेतली तर विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रिया किती गुंतागुंतीची आहे हे आपल्या लक्षात येईल.

दरम्यान निवडणुक आयोगाने जाहीर केले आहे की २७ जुलै २०२५ पर्यंत बिहार मधील एकूण मतदारांपैकी ९१.६९ टक्के मतदारांनी मतगणना फॉर्म सादर केले आहेत.निवडणूक आयोगाकडून बिहार मध्ये राबविण्यात येणाऱ्या मतदार यादी विशेष सखोल फेरतपासणी मध्ये आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्र पुरावा म्हणून ग्राह्य धरण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने नुकतेच दिले आहेत.त्याचवेळी मतदार याद्यांचा मसूदा प्रसिद्ध करण्याला स्थगिती देण्यास मात्र न्यायालयाने नकार दिला.महत्वाचे म्हणजे जगातील कोणतेही कागदपत्र बनावट तयार करता येऊ शकते, निवडणुक आयोगाने फसवणुकीची प्रकरणे स्वतंत्रपणे हाताळावीत, मोठ्या प्रमाणात मतदारांना वगळण्याऐवजी त्यांनी मोठ्या प्रमाणात मतदारांना सामावून घेतले पाहिजे,असे मत न्यायालयाने नोंदवले आहे.त्याचवेळी विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रियेत काहीही बेकायदेशीर आढळले तर संपूर्ण प्रक्रियाच रद्द केली जाईल,असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रियेवर विरोधी पक्षांनी अपेक्षेनुसार टिकेची झोड उठवली आहे.राष्ट्रिय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनी तर या प्रकरणी विधानसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याची धमकी दिली आहे. मात्र ही प्रक्रिया का आवश्यक आहे, याचा कुणीच गंभीरपणे विचार केलेला दिसत नाही.

जे मतदार मरण पावल्याचे, फेरतपासणीत आढळून आले आहे त्यांची नावे वगळावीच लागतील. जे मतदार बिहार मधून नोकरीसाठी कायमचे स्थलांतरित झाले आहेत, त्यांची नावे मतदार यादीतून काढून टाकावीच लागतील. ज्या मतदारांची नावे एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदवली गेली आहेत त्यांची नावे एकाच ठिकाणी ठेवावी लागतील.

मतदारांच्या याद्या अद्ययावत करण्यासाठी, जर निवडणुक आयोग विशेष सखोल फेरतपासणी प्रक्रिया राबवत असेल तर त्याला विरोध करण्याचे कोणतेही कारण दिसत नाही. त्यात राजकारण तर बिलकुल आणता कामा नये. अर्थात निवडणुक आयोगाने ही प्रक्रिया खूप अगोदर सुरू केली असती तर बरे झाले असते.कारण एवढ्या कमी वेळात इतकी मोठी मोहीम राबविण्यात येत असल्याने,त्यात बऱ्याच त्रुटी राहण्याची दाट शक्यता आहे. मात्र, त्याबाबत आक्षेप नोंदवण्यासाठी, निवडणुक आयोगाने पुरेसा वेळ दिला असल्याने त्या त्रुटी दूर करता येतील. ■ ■

## मनात द्रौपदीभाव ठेवूयात

वाचक लिहितात

बहिण आणि भाऊ यांच्यातील अतूट प्रेमाचे प्रतिक असणारा रक्षाबंधन हा सण. या दिवशी प्रत्येक बहीण भावाला व जर सख्खा भाऊ नसेल तर नात्यातील एखाद्या किंवा मानलेल्या भावाला राखी बांधते. महाभारत काळात भगवान श्रीकृष्णाने पांडव पत्नी द्रौपदी हिला आपली बहीण मानले होते. श्रीकृष्ण आणि सखी द्रौपदी यांच्यामध्ये पवित्र असे बहिण भावाचे नाते होते.

श्रीकृष्ण जेव्हा त्याच्या सुदर्शन चक्राने शिशुपालाचा वध करतो तेव्हा त्यालाही जखम होऊन त्याच्या बोटातून रक्त येऊ लागते. बोटातून वाहणाऱ्या रक्तप्रवाहाला थांबवण्यासाठी द्रौपदी तिच्या भरजरी साडीचा पदर फाडून त्याची चिंधी करते आणि श्रीकृष्णाच्या बोटाला बांधते. भावाला होणारा कोणताही त्रास कुठलीच बहीण कदापी सहन करु शकत नाही. यासाठी भावाला राखी बांधताना कसा भाव मनामध्ये हवा याचे आदर्श उदाहरण म्हणजे द्रौपदी असल्याने बहिणीने द्रौपदिभाव मनात ठेवून भावाला राखी बांधावी.

■ मनिषा बोराटे
सातारा.

# वीस हजार शिक्षकांचा संगनमताने तीन हजार कोटींचा घोटाळा?

## शालार्थ घोटाळा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शलार्थ आयडी घोटाळ्याला महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील सर्वात मोठ्या घोटाळ्यांपैकी एक ठरवत ३ हजार कोटी रुपयांचा घोटाळा असे संबोधले आहे.

नागपूरमध्ये ५०० हून अधिक बनावट आयडींमुळे प्रत्येकी सरासरी २० लाख रुपयांचा तोटा, एकूण १०० कोटी रुपयांहून अधिक रक्कम पगार, थकबाकी व भत्त्यांच्या स्वरूपात लाटल्याचा आरोप आहे. या हिशेबानुसार ३ हजार कोटी रुपयांच्या घोटाळ्यासाठी किमान १० हजार बनावट आयडी राज्यभर तयार केल्याचा अंदाज व्यक्त केला जातो.

नागपूरमधील या ५०० आयडी १५० शाळांमध्ये पसरलेले असून, यामुळे १५० मुख्याध्यापक, १५०-२०० शाळा व्यवस्थापन प्रमुख व १५० लिपिक झ मिळून किमान ५०० जण संशयाखाली आले आहेत. यावरून राज्यभरात २० हजार जण या घोटाळ्यात सहभागी असू शकतात, असा आरोप आहे.

### २० हजार जणांचे संगनमत शक्य आहे का?

शिक्षण खात्याचे अधिकारी, शिक्षक व शाळा व्यवस्थापन यांच्या संगनमतातून हा घोटाळा झाला, असा तपास यंत्रणांचा दावा आहे. पण शिक्षणतज्ज्ञ व राजकीय विश्लेषकांनी हा दावा अव्यवहार्य व दिशाभूल करणारा ठरवला आहे.

वेगवेगळ्या जिल्ह्यातील, विविध राजकीय व सामाजिक पार्श्वभूमीच्या २० हजार लोकांनी वर्षानुवर्षे एकत्रितपणे गुन्हेगारी कट रचणे, तोही कुठलीही माहिती गळती, भांडण किंवा व्हिसलब्लोअर न होता हे वास्तवात शक्य नाही, असे तज्ज्ञ म्हणतात. भारतामध्ये एकाचवेळी १,००० जणांनी एकत्र संगनमत केल्याचा पुरावा नाही, तर २० हजार जणांच्या अशा संगनमताचा प्रकार जगाच्या इतिहासातही अभूतपूर्व आहे.



अरुण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

असा मोठा भ्रष्टाचार वर्गात नाही, तर सरकारी कार्यालयात होतो, असे एका वरिष्ठ निवृत्त शिक्षण अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

### खरे सूत्रधार कोण?

तपास अहवालानुसार, शालार्थ आयडी थेट शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी केंद्रस्तरावरून तयार केले.

बहुतेक शिक्षकांनी केवळ लिपिकांनी दिलेल्या कागदांवर सही केली; त्यांना शालार्थच्या बॅकएंडला कोणतीही प्रवेश नव्हता.

म्हणून हा घोटाळा डिजिटल एचआर सिस्टीम हाताळणाऱ्या १००-२०० अधिकाऱ्यांच्या संगनमतातून झाला असण्याची शक्यता जास्त, असे तज्ज्ञ मानतात.

### खरी चौकशी कुठे हवी?

सरकारने तपासाचा फोकस शिक्षकांवरून हटवून शिक्षण खात्याच्या अधिकाऱ्यांवर व मंत्रालयीन पातळीवरील भ्रष्टाचारावर केंद्रित केल्याशिवाय, महाराष्ट्राच्या ३ हजार कोटींच्या शिक्षण घोटाळ्याचे खरे सूत्र उघडकीस येणार नाही आणि हा घोटाळा राजकीय कथांमध्येच दडलेला राहील.

■ ■ ■

# रोज एक महिना रिकाम्यापोटी लवंग चघळा
# बघा हे चमत्कारिक फायदे



लवंग खाल्ल्याने चिभेची चव वाढते. अलिकडे फिटनेस आणि हेल्थच्या प्रति लोक जागरुक होत आहेत. काही घरगुती टीप्स आणि हेल्थ ट्रीक्स खूप फायदा देतात. त्यातील एक लवंग चघळणे एक आहे. जर तुम्ही रोज एक महिना उपाशीपोटी लवंग चघळला तर यातून मिळणारे आरोग्याचे लाभ चमत्कारापेक्षा कमी नाहीत. ही छोटीसी वस्तू तुमच्या शरीराचा कायाकल्प करेल.

**लवंगाचे औषधी गुण**

लवंगात एण्टी -बॅक्टीरिएल, एंटी-इंफ्लेमेटरी आणि एंटी ऑक्सीडेंट गुण असतात. यात युजेनॉल नामक तत्व आढळते. जे यास औषधी रुपाने प्रभावी बनवते. याच्या नियमित सेवनाने अनेक समस्यांपासून सुटका होऊ शकते.

**पचन यंत्रणा सुधारते :** लवंगाच्या सेवनाने पचनतंत्र मजबूत होते. याने गॅस, एसिडीटी आणि अपचन सारख्या समस्या दूर होतात. रिकाम्या पोटी लवंग चघळल्याने पोटातील हानिकारक बॅक्टेरिया नष्ट होतात.

**इम्यूनिटीत वाढ होते :** लवंगातील एंटीऑक्सीडेंट तत्व रोग प्रतिकारक क्षमता मजबूत करतो.आणि शरीराला संक्रमण आणि आजारापासून वाचण्यात मदत करतो

**तोंडाचे आरोग्य सुधारते :** लवंग सेवनाने हिरड्या आणि दातांची समस्या दूर होते. आणि याचा एंटी-बॅक्टीरियल प्रभाव तोंडाची दुर्गंधी आणि कॅव्हीटी रोखण्यास मदत करतो.

**सांधेदुखीपासून सुटका :** लवंगातील एंटी-इंफ्लेमेटरी गुण सांध्यातील सूज आणि दुखणे कमी करण्यास मदत करते. लवंग नियमित चघळल्यास संधीवातासारख्या समस्येत आराम मिळतो.

**त्वचा उजळते :** लवंग शरीरातील टॉक्सिन्सना बाहेर काढते, त्यामुळे त्वचा स्वच्छ आणि चमकदार बनते. याच्या एंटीऑक्सीडेंट गुणामुळे वय वाढण्याच्या लक्षणांना कमी करते.

**ब्लड शुगर कंट्रोल :** लवंग सेवनाने ब्लड शुगरला कंट्रोल करण्यात मदत मिळते. हा उपाय डायबिटीज रुग्णांसाठी खूपच फायदेमंद मानला जातो.

**लवंग चावण्याची योग्य पद्धत**

सकाळी रिकाम्या पोटी एक ते दोन लवंग चघळा, यास चांगल्या प्रकारे चावल्यानंतर एक ग्लास गरम पाणी प्या. आणि असे एक महिना नियमितपणे करा.

**ही काळजी देखील घ्या**

जास्त प्रमाणात लवंग चघळू नये, कारण याने शरीरातील उष्णता वाढते, जर तुम्हाला कोणत्याही प्रकारची एलर्जी आहे, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या, गर्भवती महिलांनी डॉक्टरच्या सल्ल्यानुसार लवंग खाव्यात. ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### !! दोस्ती !!

संकट मे धिरज देवे
ढाल बनकर आगे आवे
ऋणानुबंध कहते इसे
जो दोस्ती मे ढल जाये..

सुख मे सब साथी
दुख मे ना कोय
ऐसे मित्र क्या काम के
जिससे जीवन दुःखी होय

पिठ पिढे वार न करे
सच्चाई का दे साथ
गलत को जो रोक लगाये
सच्चा मित्र वो कहलाये..

# बहीण-भावाच्या बंधनाला महागाईची झळ

## राख्या खरेदीसाठी ऑनलाइनचे आकर्षण ■ राखीच्या दरात 20 ते 25 टक्के वाढ, बाजारपेठा सजल्या





**नितीन दुर्बूडे**

**पथ्रोट,( दि.4 )** - श्रावण महिना लागताच सणांची रेल-चेल सुरू होते. बहीण-भावाच्या प्रेमळ नात्याचा ऋणानुबंध जपणारा सण म्हणजे रक्षाबंधन. मात्र यंदा भावा-बहिणीच्या प्रेमाचे प्रतीक असणारी राखी यंदा 20 ते 25 टक्क्यांनी महागली.

रक्षाबंधननिमित्त बाजारपेठ गर्दीने फुलून गेली आहे. भाऊरायाच्या पसंतीस उतरेल अशी राखी घेण्यासाठी महिलांनी बाजारात गर्दी केली आहे, तर दुसरीकडे आपल्या बहिणीसाठी भेटवस्तू खरेदी करताना युवावर्ग दिसत आहे. अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या रक्षाबंधनानिमित्त विविध बाजारपेठेत आकर्षक राख्या विक्रीस दाखल झाल्या आहेत.

बहिणींसाठी पवित्र मानल्या जाणाऱ्या रक्षाबंधनाच्या सणावर यंदा महागाईचे सावट दिसून येत आहे. सर्वच क्षेत्रांत वाढलेल्या महागाईचा परिणाम आता राख्यांच्या किमतीवरही दिसून येत असल्याचे चित्र बाजारपेठेत आहे. रक्षाबंधनाचा सण 9 ऑगस्ट रोजी आहे. भावांना राखी पोस्टाने पाठविण्यासाठी बहिणींची लगबग सुरू आहे. दरम्यान, गतवर्षीच्या तुलनेत यंदा राख्यांच्या दरात वाढ झाल्याचे दिसून येते. बाजारात सर्वच प्रकारच्या राख्या महाग असल्याचे दिसून येत आहे. पूर्वी देवराख्या पाच रुपये डझनप्रमाणे सहज उपलब्ध होत असत. आता या राख्यांची किंमत सात ते आठ रुपये झाली आहे. शिरूर बाजारात 5 रुपयांपासून ते 300 रुपयांपर्यंत राख्या उपलब्ध आहेत. यात 50 ते 100 रुपयांच्या राख्यांची अधिक विक्री होत आहे. राख्या खरेदीसाठी ऑनलाइनचे आकर्षण बाजारात आकर्षक ऑनलाइन राख्या उपलब्ध आहेत. त्याचवेळी बदलत्या ट्रेंड नुसार राख्या खरेदीसाठी विविध ऑनलाइन साइटवरही राख्या उपलब्ध आहेत. यामध्ये चांदीच्या राख्यांसोबतच अ‍ॅक्रेलिक व लाकूड या प्रकारातील राख्यांनाही मोठी मागणी आहे. ऑनलाइन राख्या खरेदी करताना भरघोस सूट मिळत असल्यामुळे काही बहिणींची या राख्यांना पसंती असल्याचे दिसून येते. लहान राख्यांना ग्राहकांची अधिक पसंती बाजारात लहान राख्यांना ग्राहकांची अधिक पसंती मिळत आहे. राखीसाठी लागणारे रेशीम, कुंदन तसेच मजुरीत वाढ झाल्याने गतवर्षीच्या तुलनेत यंदा राख्यांच्या भावात 10 टक्क्यांची वाढ झाली असे राखी विक्रेत्यांनी सांगितले.

### कुंदन वर्क, साध्या राख्यांना मागणी

चिमुकल्यांसाठी लायटिंग राख्या, छोटा भीम, डोरेमॉन, मोटू पतलू, श्री गणेशा, श्रीकृष्ण अशा राख्या वाज-रात विक्रीस आल्या आहेत. कुंदन वर्क आणि साध्या राख्यांना जास्त मागणी आहे. लायटिंग, लाकडी, पपेट, कडा राखीसह पारंपरिक देव राखी अशा विविध प्रकारच्या राख्या बाजारात विक्रीस आल्या आहेत.

# धामणधस व पळसोना शिवारात सलग दोन दिवस चोरीचे सत्र

## पोलिसांचे दुर्लक्ष, शेतकऱ्यांमध्ये संताप

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.4 )** - तालुक्यातील मौजा धामणधस आणि पळसोना शिवारातील शेतकऱ्यांच्या शेतात सलग दोन दिवसांपासून रात्रीच्या सुमारास चोरीच्या घटना घडत आहेत. अज्ञात चोरट्यांनी विद्युत केबल्स, मोटार पंप, औजारांसह शेतीसाठी अत्यावश्यक साहित्य चोरून नेल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. पोलिसांकडे तक्रारी करूनही ठोस कारवाई न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड संताप आहे.

चोरीच्या घटनांमध्ये शेतकरी अनुप कट्यारमल, धीरज यावले यांच्यासह इतर शेतकरी बाधित झाले आहेत. चोरी झालेले साहित्य हजारो रुपयांचे असून त्याचा थेट परिणाम शेतीच्या कामावर होत आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या रोजीरोटीवर गंभीर परिणाम झाला आहे. विशेष म्हणजे, या परिसरात यापूर्वीही अशा घटना घडल्या असून, पोलिसांनी कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत. रात्री गस्त वाढवावी, शिवार भागात सीसीटीव्ही व सौर दिवे बसवावेत, तपास जलदगतीने करून आरोपींना अटक करावी, तसेच शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळावी, अशा मागण्या शेतकऱ्यांनी केल्या आहेत. सलग होत असलेल्या चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शासन व पोलीस प्रशासनाने तातडीने लक्ष घालून कडक उपाययोजना केल्या नाहीत तर शेतकरी वर्गाकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# मोकाट जनावरांमुळे प्रसिद्ध विधिज्ञ ॲड. भूषण बेहरे यांचा मृत्यू

## वरुडमध्ये दुर्दैवी अपघात ■ प्रशासनाच्या निष्क्रीयतेवर तीव्र संताप; शहरात शोककळा



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड ( दि. 4 )** - शहरातील कडू गोठाण परिसरातील पुलावर सोमवारी सायंकाळी घडलेल्या दुर्दैवी अपघातात वरुडचे सुप्रसिद्ध विधिज्ञ ॲड. डॉ. भूषण विठ्ठलराव बेहरे (वय 47) यांचा मृत्यू झाला. मोकाट जनावरांमुळे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडल्याची माहिती आहे.

ॲड. भूषण बेहरे हे वरुड येथील सत्र न्यायालयात वकिल म्हणून कार्यरत होते. सोमवारी सायंकाळी चारच्या सुमारास ते न्यायालयात काम आटपून दुचाकीने घरी परतत होते. दरम्यान, कडू गोठाण परिसरातील पुलावर रस्त्याच्या कडेला बसलेली मोकाट जनावरे अचानक पळत सुटली, त्यामुळे त्यांनी घाबरून दुचाकीवरील नियंत्रण गमावले. नियंत्रण सुटल्याने ते दुचाकीसह पिण्याच्या पाईपलाइनवर आदळले आणि जागीच बेशुद्ध पडले. घटनेनंतर काही वेळातच विद्यार्थी वाहतूक करणारे आशिष भाकरे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्परता दाखवून त्यांना शासकीय ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, दोन मुले, भाऊ डॉ. संदीप बेहरे, एक बहीण असा आप्त परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे संपूर्ण शहरात शोककळा पसरली असून मोकाट जनावरांच्या प्रश्नावर संताप व्यक्त केला जात आहे.

### निगरगट्ट प्रशासन, मोकाट जनावरे आणि अपयशी यंत्रणा

वरुड शहरात गेल्या अनेक वर्षांपासून मोकाट जनावरांचा प्रश्न विकोपाला गेल्याची ओरड सुरू असतानाही प्रशासन मात्र मूग गिळून गप्प आहे. पावसाळ्यात अशा घटना घडण्याची शक्यता अधिक असते. मात्र, नगर परिषद व पशुवैद्यकीय विभाग या विषयावर थातूरमातूर कारवाई करून जबाबदारी टाळतात, असा आरोप नागरिकांनी केला आहे. ही जनावरे आणखी किती निष्पाप जीवांचे बळी घेणार ? असा संतप्त सवाल आता जनतेकडून उपस्थित केला जात असून मोकाट जनावरांवरील ठोस उपाययोजनेसाठी तातडीची गरज असल्याचे स्पष्ट होत आहे.

# शिवाजी शाळेत ‘लोकशाही बळकटीकरण सप्ताह’ उत्साहात साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.4 )** - स्थानिक शिवाजी उच्च माध्यमिक शाळेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर लोकशाही बळकटीकरण अभियानांतर्गत ‘सन्मान शक्तीचा, मतदान हक्काचा’ या संकल्पनेवर आधारित विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून शाळेतील विद्यार्थी तसेच स्थानिक नागरिकांमध्ये लोकशाही मूल्यांची उजळणी करत नवीन मतदार नोंदणी व मतदानाविषयी जनजागृती करण्यात आली.



उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा, सांस्कृतिक सादरीकरण आणि रॅलीद्वारे लोकशाहीचा महिमा समाजापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. ‘माझं मत, माझा अधिकार’ या विषयावर निबंध, चित्रकला व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी रस्त्यावरून रॅली काढून मतदानाचे महत्त्व सांगणारे फलक आणि घोषवाक्यांद्वारे परिसर दणाणून सोडला. वक्तृत्व स्पर्धेत विद्यार्थ्यांनी लोकशाही, मतदान प्रक्रिया आणि जबाबदार नागरिकत्व यावर प्रभावी मते मांडली. संपूर्ण कार्यक्रमाची संकल्पना आईचा गौरव आणि स्त्रीशक्तीचा सन्मान या भावनेतून राबवण्यात आली. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्यातून प्रेरणा घेत अहिल्यादेवींच्या विचारांचा सन्मान ही थीम केंद्रस्थानी होती. शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत देशमुख यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्याध्यापक मिलिंद ढाकुलकर, पर्यवेक्षक विठ्ठल नवरे, शिक्षक प्रतिनिधी अशोक चौधरी, शिक्षकेतर प्रतिनिधी विठ्ठल गवई, पवन भागवत, विजय तारापुरे व कार्यक्रम प्रभारी प्रेमा नवरे यांनी विशेष परिश्रम घेतले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग हा कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

# झटामझिरी येथे ‘एक पेड माँ के नाम’ अंतर्गत वृक्षारोपण



### महसूल दिनानिमित्त कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.4 )**- महसूल दिनाच्या निमित्ताने झटामझिरी येथे एक पेड माँ के नाम या विशेष उपक्रमांतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन आणि वृक्षांचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात 300 हून अधिक विविध फळझाडांची लागवड करण्यात आली. हा कार्यक्रम महसूल विभाग, ग्रामपंचायत, सामाजिक वनीकरण विभाग, जिल्हा परिषद शाळा आणि विविध शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला.

वन आणि झाडे हे निसर्गाचे महत्त्वाचे घटक असून त्यांचे संवर्धन ही काळाची गरज आहे. 1979 मध्ये प्रा. डॉ. तारक मोहन दास यांच्या अभ्यासानुसार एका झाडाची आर्थिक किंमत 2 लाख डॉलर्स एवढी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. झाडे हवामान शुद्धीकरण, मातीचे संरक्षण, जलपुनर्भरण आणि जैवविविधतेचे रक्षण यांसारख्या महत्त्वपूर्ण सेवा देतात.

### 300 हून अधिक फळझाडांची लागवड

उपक्रमांतर्गत आंबा, फणस, सीताफळ, आवळा, लिंब, नारळ, चिंच, जांभूळ, पेरू, वड आदी स्थानिक आणि उपयोगी वृक्षांची लागवड करण्यात आली. यामुळे भविष्यात ग्रामस्थांना पर्यावरणीय व आर्थिक लाभ होणार आहे. यावेळीतहसीलदार रामदास शेळके, ना. तहसीलदार पंकज चौहान, पोलीस निरीक्षक अर्जुन ठोसरे, उपविभागीय अधिकारी शेषराव बोभाटे, वनपरीक्षेत्र अधिकारी भुजाडे, सरपंच हिराकांत उईके, उपसरपंच रवींद्र शिवणकर, ग्रामसेविका वंदना भलावी यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पोलीस अधिकारी, महसूल कर्मचारी, शैक्षणिक संस्था, विद्यार्थी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या समारोपाला उपस्थित मान्यवरांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प केला. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारून भविष्यातील पिढ्यांसाठी हिरवेगार भविष्य घडविण्याची वचनबद्धता यावेळी व्यक्त करण्यात आली.

# फुटलेले रपटे देताहेत अपघाताला आमंत्रण

## हिवरखेडवासीयांमध्ये संताप



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,( दि.4 )**- येथील ग्रामपंचायतीच्या नाकर्तेपणामुळे गावातील अनेक नाक्यावरील रपटे फुटले असून रस्त्यांची दयनीय अवस्था निर्माण झाली आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

गावातील प्रमुख चौक आणि रस्त्यांवरील रपटे तुटल्याने दुचाकीस्वार तसेच वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. वारंवार अपघात होऊनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही दुरुस्तीची उपाययोजना केली जात नसल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. याशिवाय, गावात अवैध धंदेही जोरात सुरू असल्याची तक्रार स्थानिकांनी केली आहे. या अवैध कारभाराला आळा घालण्यासाठी आणि रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, योग्य पावले उचलली नाहीत तर ग्रामपंचायतीविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल.

# बंद घर फोडून 2.37 लाखांचे दागिने व रोकड लंपास

**अमरावती** - शहरातील सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मांगीलाल प्लॉट भागात एक महिला पुण्याला आपल्या मुलीकडे गेली असताना अज्ञात चोरट्यांनी तिच्या बंद घराचा फायदा घेत 2 लाख 37 हजार 500 रुपयांचा ऐवज लंपास केला. चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत सोने-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा मौल्यवान माल चोरून नेला. महिलेच्या फिर्यादीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.


## अमरावती महानगरपालिका अमरावती

( बांधकाम विभाग- शहर अभियंता )

- निविदा सुचना-

अमनपा/बां.वि/श.अ./नि.सु.क्र./30/25 दि.01/08/2025

अमरावती महानगरपालिका शहर अभियंता, बांधकाम विभाग मधील विकास शुल्क निधी अंतर्गत करावयाच्या कामाचा निविदा प्रसिध्दीचा जा.क्र.30 / 25 दि. 01/08/2025 नुसार मनपाच्या बांधकाम विभागातील नोटीस बोर्ड वर सविस्तर निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**खालील प्रमाणे मॅन्युअल-निविदा सुचना कार्यक्रम दिलेला आहे.**

| | |
|---|---|
| मॅन्युअल-निविदा प्रसिद्धी | दि 01/08/2025 |
| कोऱ्या निविदा करीता अर्ज करण्याचा दिनांक | दि 11/08/2025 |
| निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दि 14/08/2025 दु. 4.00 वाजेपर्यंत |
| मॅन्युअल -निविदा उघडण्याची दिनांक (Technical) | दि. 14/08/2025 दु. 4.00 वा. (शक्य झाल्यास) |

**शहर अभियंता**
**महानगरपालिका, अमरावती**


# चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनलगत टिनपत्र्यांचे खोके काढण्यासाठी बळजबरी?

## कुठलाही अडथळा नसताना पोलिसांकडून दुकानदारांना दमदाटीचा आरोप

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.4 )** - चांदूर रेल्वे पोलिस स्टेशनलगत असलेल्या टिनपत्र्यांच्या खोक्यांना काढण्यासाठी पोलिसांनी बळजबरी सुरू केल्याचा आरोप स्थानिक दुकानदारांनी केला आहे. कोणताही अडथळा नसतानाही पोलिसांकडून दमदाटी केली जात असल्याचे दुकानदारांचे म्हणणे आहे.

शुक्रवारी दुपारी साडेअकरा वाजताच्या सुमारास 15 ते 20 पोलिसांचा ताफा घेऊन आलेल्या चांदूर रेल्वे पोलिसांनी दुकानदारांना तोंडी आदेश देत त्यांची दुकाने उचलण्यास सांगितले. यावेळी काही दुकाने समोरील तात्पुरत्या झडप्या काढण्यात आल्या. कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा अथवा न्यायालयाचा आदेश नसतानाच ही कारवाई करण्यात आली असल्याने ती सूडात्मक भावनेतून केल्याचा आरोप करण्यात येत आहे.



### नगरपालिकेच्या परवानगीने उभारलेले खोके

मन्नालाल गुप्ता विद्यालयाजवळील आणि पोलिस स्टेशनच्या कंपाऊंडलगत असलेल्या नगरपालिकेच्या ई-क्लास जागेवर परवानगी घेऊन ही दुकाने उभारण्यात आली आहेत. येथे पत्रकारांचे संपर्क कार्यालय असलेला टिनखोका देखील आहे. पोलिस स्टेशनच्या परिसरात नव्या इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास आले असून, आता पोलिस या खुल्या जागेवर खोटा हक्क दाखवत असल्याचा आरोप आहे.

### पोलिसांकडून माहिती न दिल्याचा आरोप

स्थानिक पत्रकारांनी पोलिस स्टेशनकडे जागेची सीमा आणि क्षेत्रफळाची माहिती मागितली असता संबंधित अधिकाऱ्यांनी माहिती देण्यास नकार दिला. उलट मुंबई पोलिस अधिनियम 1951 नुसार पोलिसांना अतिक्रमण काढण्याचा अधिकार असल्याचे तोंडी सांगण्यात आले.

### काय सांगतो मुंबई पोलिस अधिनियम 1951 ?

या अधिनियमाअंतर्गत पोलिसांना थेट अतिक्रमण काढण्याचा अधिकार नाही. त्यासाठी त्यांना न्यायालयाचा आदेश किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे निर्देश आवश्यक आहेत. कलम 37 अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी गैरवर्तन किंवा गुन्हेगारी कृत्यांवर कारवाई करता येते, मात्र याचा वापर अतिक्रमण काढण्यासाठी थेट करता येत नाही. केवळ सार्वजनिक सुरक्षिततेस धोका निर्माण झाल्यासच पोलिसांना योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार आहे.

# चविष्ट मसाला शेवया

झटपट रेसिपी



न्याहरीचा एक उत्तम पर्याय म्हणजे मसाला शेवया. हा झटपट तयार होणारा आरोग्यदायी पदार्थ आहे. हॉस्टेलमध्ये काही तरी वेगळं ट्राय करायचं असेल तर मसाला शेवया नक्की करून बघा.

**सामग्री :** एक कप भाजलेल्या शेवया, एक बारीक चिरलेला कांदा, बारीक चिरलेला टोमॅटो, एक चमचा आलं-लसूण पेस्ट, अर्धा कप उकडलेले मटार, एक बारीक चिरलेली सिमला मिरची, अर्धा चमचा जीरं, अर्धा चमचा लाल तिखट, प्रत्येकी अर्धा चमचा हळद आणि धनेपूड, एक चमचा गरम मसाला, लिंबाचा रस, एक कप पाणी, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ

**कृती :** कढईत दोन ते तीन चमचे तेल गरम करा. त्यात जीरं घाला. मग कांदा परतून घ्या. यानंतर सिमला मिरची आणि मटार घालून परता. सोबत आलं-लसूण पेस्ट घाला. मग लाल तिखट, धनेपूड, हळद घालून परतून घ्या. मसाल्यातून तेल सुटलं की त्यात शेवया घाला. चवीनुसार मीठ घाला. पाणी घालून शिजवून घ्या. पाणी आटल्यावर गरम मसाला घाला. दोन मिनिटं शिजू द्या. गॅस बंद करा. शेवयांवर कोथिंबिर घाला. गरमागरम खा.




## शेर की जुबानी

दिल के लिये हयात का,
पैगाम बन गई,
बेचैनियां सिमट के तेरा,
नाम बन गई।

दिल पर हम बेवजहा
इल्जाम लगाते हैं,
धोका तो अक्सर
धडकन दिया करती है।

ये दोस्ती भी
एक रिश्ता है,
जो निभा दे वो
फरिश्ता है।

# प्रवास डिलिव्हरी बॉयचा

अचिव्हर



समस्तीपूर हे बिहार राज्यातील एक प्रसिद्ध शहर आहे. एकेकाळी येथील एक मास्टर साहेब विद्यार्थ्यांना बीजगणिताचे तत्व शिकवत होते. बेरीजचा कम्युटेटिव्ह गुणधर्म समजावून सांगताना त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, तुम्ही संख्यांचा क्रम बदलला तरी त्या संख्यांची बेरीज किंवा निकाल बदलणार नाही. उदाहरणार्थ, तीन अधिक चार आणि चार अधिक तीन यांचे उत्तर सारखेच आहे. त्याचप्रमाणे अनेक संख्यांच्या गटाचा क्रम बदलल्याने निकाल बदलत नाही. त्या विद्यार्थ्यांमध्ये एक मुलगा होता. तो हे सगळं ऐकून हसत होता. कारण त्याने इतर मुलांसमोर तो विषय आधीच वाचला होता. तो मुलगा दुसरा तिसरा कोणी नसून 'सीएबीटी लॉजिस्टिक्स'चे संस्थापक शैलेश कुमार होते.

'सीएबीटी लॉजिस्टिक्स' स्थापनेच्या प्रवासात तो अनेक वेळा पडला. परंतु त्याने परिस्थितीसमोर झुकण्यास नकार दिला. त्याच्या धाडसाचे फळ म्हणजे आज 'सीएबीटी लॉजिस्टिक्स' सुमारे १६० कोटी रुपयांची वार्षिक उलाढाल करणारी कंपनी बनली आहे. गरीब वातावरणात वाढलेल्या शैलेश कुमारचा प्रवास त्याच्या संघर्ष, कुतूहल आणि दृढनिश्चयाचे प्रेरणादायी उदाहरण आहे. वारंवार अपयश येऊनही लॉजिस्टिक्स क्षेत्रातील दिग्गजांपैकी एक बनण्याची शैलेश कुमारची कहाणी महत्त्वाकांक्षी उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरते. शैलेश कुमारचा जन्म १९८६ मध्ये एका सामान्य कुटुंबात झाला. त्याचे वडील गणिताचे शिक्षक होते. त्यांचा पगार फक्त १४०० रुपये होता. शैलेश कुमारला तीन भावंडे होती आणि ते सर्व एका खोलीच्या छोट्या घरात राहत होते. शैलेशला बालपणातच समजले होते की गरिबीच्या या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा एकमेव मार्ग आहे. शिक्षण हाच त्याच्या जीवनाचा दर्जा सुधारण्याचा एकमेव मार्ग मानून तो आयुष्यात पुढे गेला.

सुरुवातीचे शिक्षण घेतल्यानंतर तो कोटा येथे गेला आणि आयआयटीची तयारी केली. परंतु अनेक प्रयत्नांनंतरही त्याला यश मिळाले नाही. निराश होऊन शैलेश घरी परतला आणि वडिलांच्या सल्ल्यानुसार त्याने पंजाब टेक्निकल युनिव्हर्सिटीमधून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले आणि २०११ मध्ये तो अभियंता झाला. आता आव्हान होते चांगली नोकरी मिळवण्याचे. अनेक लहान-मोठ्या नोकऱ्या केल्यानंतर त्याला शेवटी डेलमध्ये ३२,००० रुपयांची नोकरी मिळाली. सर्वप्रथम त्याच्या कॅब ड्रायव्हरला ६०,००० रुपये कमावताना पाहून त्याने येथे स्वतःचा कॅब व्यवसाय सुरु करण्याचा निर्णय घेतला. पहिले दोन व्यवसाय अयशस्वी झाले त्याने कर्ज घेऊन टोयोटा इनोव्हा कार खरेदी केली आणि यात्रा डॉट कॉममध्ये सामील झाला. व्यवसाय वाढवण्यासाठी त्याने कर्ज घेऊन अधिक वाहने खरेदी केली. सर्व काही व्यवस्थित चालले होते. नंतर डिझेल वाहनांवर बंदी आल्यामुळे त्याला हा व्यवसाय बंद करावा लागला. शैलेश थांबला नाही. त्याला एचसीएलमध्ये नोकरी मिळाली आणि तो तिथे मॅनेजर झाला. तथापि त्याला नोकरी आवडली नाही आणि त्याने ई-कॉमर्स स्टार्टअप सुरू केला. काही काळानंतर वस्तू विकल्या जात नसल्यामुळे त्याला तोटा होऊ लागला. म्हणून त्याला तोदेखील बंद करावा लागला.

पहिल्या दोन व्यवसायांच्या अपयशानंतर त्याने जवळजवळ सर्व बचत गमावली होती. आता त्याच्याकडे रोजगार नव्हता आणि उत्पन्नाचा दुसरा कोणताही स्रोत नव्हता. पैसे कमवण्यासाठी तो फ्लिपकार्टमध्ये डिलिव्हरी बॉय बनला. यासाठी त्याला १७,००० रुपये मानधन मिळत असे. या काळात त्याला लक्षात आले, की लॉजिस्टिक्सची संपूर्ण व्यवस्था गोंधळलेली आहे. यानंतर, त्याने भारताच्या अव्यवस्थित डिलिव्हरी इकोसिस्टमच्या समस्येवर मात करण्यासाठी 'सीएबीटी लॉजिस्टिक्स' सुरू करण्याचा विचार केला. २०१८ मध्ये त्याने शहरांतर्गत लॉजिस्टिक्स फर्म सीएबीटी लॉजिस्टिक्सची स्थापना करून स्वतःचा ब्रँड तयार केला.

## वेगळे काही

### बाळाला झोपवण्यासाठी 'एआय'



'ओपन एआय'चे 'सीईओ' आणि चॅटजीपीटी जगासमोर आणणारे सॅम ऑल्टमन आणि त्यांचे पार्टनर ऑलिव्हर मुल्हेरिन यांनी या वर्षाच्या सुरुवातीला पहिल्या बाळाचे स्वागत केले. बाळांच्या काळजीची शिफारस करताना ऑल्टमनने स्वतः सोशल मीडिया पोस्टमध्ये ही माहिती दिली. एक्स वर (पूर्वीचे ट्विटर) त्यांनी लिहिले, आम्हाला गरज नसलेल्या अनेक वस्तू आम्ही बाळासाठी खरेदी केल्या. परंतु मी निश्चितपणे 'क्रेडलवाइज स्विंग' आणि भरपूर बर्प रॅग्सची शिफारस करेन.'' ऑल्टमनच्या या छोट्या पोस्टमुळे जगभरात ' क्रेडलवाइज' नावाच्या स्मार्ट स्विंगची चर्चा पसरली. बेंगळुरूमधील स्टार्टअप ' क्रेडलवाइज' कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे बाळ जागे होण्याची सुरुवातीची चिन्हे ओळखते आणि हळूहळू त्याला पुन्हा झोपायला लावते. टेक्नो सॅव्ही पालकांमध्ये आधीच लोकप्रिय होत असलेल्या या तंत्रज्ञानाला आता 'एआय' उद्योगातील सर्वात विश्वासार्ह नावाकडून मान्यता मिळाली आहे आणि त्याचा मोठा परिणाम झाला आहे.

# जपानमध्ये सर्वात फास्ट इंटरनेट

टेक टॉक




तुम्ही ॲप उघडण्यासाठी लागणाऱ्या वेळेत संपूर्ण नेटफ्लिक्स लायब्ररी डाउनलोड करू शकाल का? हा विनोद नाही, तर जपानमध्ये अलीकडेच उदयास आलेल्या इंटरनेट तंत्रज्ञानाचे खरे स्वरूप आहे. जून २०२५ मध्ये जपानच्या राष्ट्रीय माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान संस्थेने (एनआयसीटी) जगातील सर्वात वेगवान इंटरनेट गतीचा विक्रम मोडला. त्यांनी प्रति सेकंद १.०२ पेटाबाइट्स म्हणजेच प्रति सेकंद १ दशलक्ष गीगाबाइट्सपेक्षा जास्त वेगाने डेटा प्रसारित केला.

स्टीमवरील सर्व गेमची एकूण साईझ सुमारे १.२ पेटाबाइट्स आहे. या नवीन गतीसह तुम्ही तुमच्या सिस्टममध्ये बाल्डूरच्या गेट ३ पासून काउंटर-स्ट्राइक २ पर्यंतचे सर्व गेम्स काही सेकंदात डाउनलोड करू शकता. तुम्ही एकाच वेळी १ कोटी ८ के व्हिडिओ स्ट्रीम करू शकता. म्हणजेच न्यूयॉर्क आणि टोकियोच्या संपूर्ण लोकसंख्येने एकाच वेळी वेगवेगळे चित्रपट पाहिले तरी वेग कमी पडणार नाही. स्पॉटिफायच्या मते एका मिनिटाचे गाणे सुमारे १ एमबी असते. त्यानुसार तुम्ही एका सेकंदात ६७ दशलक्ष गाणी म्हणजेच सुमारे १,२७,५०० वर्षांचे संगीत डाउनलोड करू शकता. इंग्रजी विकिपीडिया सुमारे शंभर जीबी आहे.

# फॉलो द एटिकेट्स

फिटनेस फंडा



दोस्तांनो, तुम्ही जीमला जाता. जीममध्ये काही एटिकेट्स फॉलो करावे लागतात. हे नियम कुठेही लिहून ठेवलेले नसतात. पण आपणच काही गोष्टींची काळजी घ्यायला हवी. जीममध्ये कोणत्या गोष्टी टाळता येतील? जाणून घेऊ.

✻ आपण जीममधली उपकरणं वापरतो. डंबेल्ससारखी उपकरणं विशिष्ट ठिकाणी ठेवलेली असतात. त्यामुळे वापरानंतर ती जागच्या जागी ठेवायला हवीत. काहीजण डंबेल्स व्यायामाच्या ठिकाणीच ठेऊन जातात. मग जीममधल्या कर्मचाऱ्यांना ती नीट ठेवावी लागतात. त्याऐवजी आपणच ती जागेवर ठेवणं योग्य ठरतं.

✻ व्यायाम करून कितीही दमलात तरी हातातले डंबेल्स जोरात खाली टाकू नका. यामुळे डंबेल्स तुटू शकतात. इतरांचंही लक्ष विचलित होतं. त्यामुळे प्रत्येक उपकरण हळूवारपणे खाली ठेवा.

✻ जीममध्ये गेल्यावर स्मार्टफोन शक्यतो बाजूलाच ठेवावा. फोन जवळ असला तरी त्यावर मोठ्याने बोलू नये. जीममध्ये म्युझिक सुरू असतं. लोकांचा आवाजही येत असतो. त्यामुळे ऐकू आलं नाही तरी तुम्ही हळूच बोला.

✻ व्यायाम करताना इतरांशी गप्पा मारू नका. सगळं लक्ष व्यायामावर केंद्रित करा. मोठ्याने गप्पा मारल्याने इतरांना त्रास होऊ शकतो.

## डेटा सेफ्टी

### पासवर्ड सुरक्षित ठेवायचाय?




कोणीही आपला पासवर्ड हॅक करू नये आणि माहिती पूर्णपणे सुरक्षित राहावी, असे तुम्हाला वाटत असेल तर या गोष्टी नक्की फॉलो करा. पासवर्ड लांब आणि गुंतागुंतीचा ठेवा. कोणत्याही शब्दकोशात सापडणार नाही असा किमान १२ अक्षरांचा पासवर्ड ठेवा. मोठ्या आणि लहान अक्षरे, संख्या आणि विशेष चिन्हांचे मिश्रण आवश्यक आहे. नावे, जन्मतारीख किंवा सोपे शब्द टाळा. हॅकर्स प्रथम १२३४५६, पासवर्ड, इंडिया २०२४ सारखे पासवर्ड वापरून पाहतात. प्रत्येक खात्यासाठी वेगळा पासवर्ड ठेवा. सर्वत्र एकच पासवर्ड असेल आणि तो विसरला तर सर्वकाही धोक्यात येईल. वेगवेगळ्या खात्यांसाठी वेगवेगळे पासवर्ड तयार करणे आणि लक्षात ठेवणे कठीण वाटत असेल तर पासवर्ड मॅनेजरची मदत घ्या. हे टूल तुमच्यासाठी मजबूत पासवर्ड तयार करते आणि ते सुरक्षितपणे सेव्ह करते. तुम्हाला फक्त एक मास्टर पासवर्ड लक्षात ठेवावा लागेल.

# ट्रेंडी ऑफिसवेअर

फॅशन पॅशन



दोस्तांनो, कामाच्या ठिकाणी स्टायलिश दिसण्यासोबतच आरामदायीही वाटायला हवं. त्यातच फॉर्मल्समध्ये आपलं व्यक्तिमत्त्वही उठून दिसायला हवं. यासाठी तुम्ही ट्राउझर्सचे काही लेटेस्ट ट्रेंड ट्राय करू शकता.

✻ अँटी फ्लेक्स ट्राउझर्समध्ये तुम्हाला आरामदायी वाटू शकतं. या ट्राउझर्सच्या कंबरेला स्ट्रेच होणारा बँड दिलेला असतो. यामुळे या पँट्स व्यवस्थित बसतात. यासोबतच पँटच्या खिशांना सेफ्टी झिपर्सही असतात.

✻ शार्प आणि स्लिक दिसण्यासाठी ड्रेस पँट्स ट्राय करा. या पँट्स तयार करण्यासाठी खास कापड वापरलं जातं. यामुळे त्यावर सुरकुत्या पडत नाहीत.

✻ सध्या लाईटवेट ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.





# पावसाळी भ्रमंती

भटकंती

पावसाळा अतिशय आल्हाददायक असतो. या ऋतूत प्रत्येकाला छान थंड हवा, दऱ्या, डोंगरात जायला आवडते. तुम्हाला पावसाळ्याचा पुरेपूर आनंद घ्यायचा असेल तर भारतातील काही ठिकाणे तुमच्यासाठी परफेक्ट ठरू शकतात.

**कोडईकॅनॉल**

तामिळनाडूत वसलेले कोडईकॅनॉल पावसाळ्यात अक्षरशः स्वर्गासारखे रम्य दिसते. हे हिल स्टेशन समुद्रसपाटीपासून २१३३ मीटर उंचीवर आहे. याला 'हेल ऑफ क्वीन्स' असेही म्हणतात. पावसाळ्यात फिरण्यासाठी हे ठिकाण परफेक्ट आहे. येथे आपल्या जोडीदारासोबत रोमान्सचा एक क्षण घालवू शकता.

**अलेप्पी**

अलेप्पीला केरळचे व्हेनिस म्हणतात. पावसाळ्यात येथे फिरण्याचा बेत आखला, तर तुमचा प्रवास संस्मरणीय ठरेल. इथे तुम्हाला शांतता वाटेल.

**झिरो व्हॅली**

अरुणाचल प्रदेशातील झिरो व्हॅली समुद्रसपाटीपासून सुमारे ५,६०० फूट उंचीवर आहे. इथले सुंदर तलाव आणि धबधबे पाहून तुम्हाला इथे स्थायिक होण्याची इच्छा होईल. याशिवाय तवांगलाही जाऊ शकता.

**लोणावळ्याचा खास प्लॅन**

पावसाळ्यात फिरण्याची चर्चा होते तेव्हा महाराष्ट्रातील एक नाव नक्कीच घेतले जाते. पावसाळ्याची खरी मजा एन्जॉय करायची असेल तर महाराष्ट्रातील लोणावळ्याला नक्की जा.

**कुर्ग**

पावसाळ्यात कुर्गचे सौंदर्य पाहण्यासारखे असते. कर्नाटकातील कुर्ग पावसाळ्यात अधिकच आकर्षक बनते. इथली हिरवळ आणि हिरवेगार डोंगर प्रत्येकाच्या मनाला भुरळ घालतात.

# दिसणं महत्त्वाचं आहे?

मॅच मेकिंग



मी २७ वर्षांची मुलगी आहे. गेल्या काही दिवसांपासून माझ्यासाठी सुयोग्य जोडीदाराचा शोध सुरू आहे. मध्यंतरी माझ्यासाठी एक स्थळ आलं होतं. मुलगा आयुष्यात स्थिरस्थावर असून त्याचं कुटुंब खुल्या विचारांचं आहे. पण तो दिसायला सर्वसाधारण आहे. खरं सांगायचं तर थोडा स्थूल आहे. मला तो पसंत पडलेला नाही. मी गोंधळून गेले आहे. माणूस म्हणून तो खूप चांगला आहे. त्याची जीवनशैली माझ्यापेक्षा खूप वेगळी आहे. मला आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा मुलगा हवा आहे. आमची लाईफस्टाईल जुळत नसल्याने मी त्याला नकार द्यावा का बाकी सगळं चांगलं नसल्यामुळे याकडे दुर्लक्ष करावं? याबाबत मला मार्गदर्शन करा.

**उत्तर :** स्थूलपणा सोडल्यास त्याच्यात कोणतीही कमतरता नसेल तर तू याबाबत त्याच्याशी बोलू शकतेस. त्याला भेटून तुझं मत मांडायला काहीच हरकत नाही. आरोग्यदायी जीवनशैली, फिटनेस यांचं महत्त्व तू त्याला पटवून देऊ शकतेस. आजकाल एका स्थूलपणामुळे सामान्य माणसाला किती व्याधी जडू शकतात, याची माहिती घे. गरज वाटल्यास समुपदेशकांची मदत घेता येईल. त्यामुळे नकार देण्याचा निर्णय घाईघाईने घेऊ नकोस.

## जाणून घ्या

### पावसाळ्यात अशी घ्या काळजी



मुसळधार पाऊस पडत असेल तेव्हा लगेच फ्रीज आणि एसीचा प्लग काहीवेळासाठी सॉकेटमधून काढून टाका. पावसाळ्यात वारंवार वीज खंडित होते. शिवाय पावसाळ्यात व्होल्टेजमध्ये चढ-उतार होणेदेखील सामान्य आहे. अशा परिस्थितीत पावसाळ्यात सॉकेटमधून फ्रीज आणि एसीचा प्लग काढून टाकणे सुरक्षित असते. यामुळे तुमच्या इलेक्ट्रॉनिक वस्तू सुरक्षित राहण्यास मदत होईल. भिंतीवर ओलसरपणा असल्यास ही भीती असते. बरेचदा सततच्या पावसामुळे घरात ओल येते. तुमच्या घराच्या भिंतीवर एसी किंवा फ्रिज सॉकेट असेल तर त्या भिंतीवरील प्लग काढून टाका. ओल आल्यामुळे फ्रीज किंवा एसीच्या प्लगमध्ये पाणी गेले तर शॉर्ट सर्किट होण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत भिंतीवरील ओलसरपणा सुकेपर्यंत सॉकेटमधून प्लग बाहेर ठेवणे चांगले. फ्रीजजवळ दुसरा कोणताही सॉकेट नसेल तर भिंतीवरील ओल जाईपर्यंत तुम्ही एक्सटेंशन बोर्ड वापरू शकता. एसीचे आउटडोअर युनिट पावसाचे पाणी थेट पोहोचते अशा ठिकाणी बसवले असेल तर विशेष काळजी घ्या. पावसाळ्यात एसी वापरात नसताना आउटडोअर युनिट झाकणे चांगले. बाजारात एसीच्या आउटडोअर युनिटसाठी प्लास्टिक कव्हर्स उपलब्ध आहेत. यामुळे तुमच्या एसीच्या आउटडोअर युनिटचे पावसाच्या पाण्यापासून संरक्षण होईल. असे करणे शक्य नसेल तर पावसाळ्यात आणि पावसानंतर आउटडोअर युनिट पूर्णपणे सुकेपर्यंत एसी चालू करू नका. पावसाळ्याच्या दिवसात बाहेर बसवलेले ट्रान्सफॉर्मर वगैरे वस्तू ओल्या होतात आणि त्यामुळे विजेचा चढउतार वाढतो. अशा परिस्थितीत रेफ्रिजरेटर आणि एसीसोबत स्टॅबिलायझर वापरणे शहाणपणाचे आहे.

# क्षेत्र फोटो जर्नलिझमचं...

करियरवाट



दोस्तांनो, एक फोटो खूप काही सांगून जातो. फोटोतून आपण आपल्या भावना व्यक्त करू शकतो. एखादा फोटो लोकांच्या मनाला भिडतो. त्या फोटोतून एखाद्या ठिकाणच्या परिस्थितीचा अंदाज घेता येतो. तुम्हालाही फोटोतून व्यक्त व्हायचं असेल तर फोटो जर्नलिझमचा पर्याय उपलब्ध आहे. फोटो जर्नलिझम हे रंजक आणि धाडसी करिअर आहे. यात तुम्ही अंगभूत कौशल्यांचा वापर करू शकता. या क्षेत्रातल्या करिअरबाबतचं हे मार्गदर्शन...

✻ सध्या लाईटवेट ट्राउझर्सही मिळतात. कमी वजनाच्या या ट्राउझर्समध्ये तुम्ही आरामात वावरू शकता. या ट्राउझर्स तयार करण्यासाठी आरामदायी फॅब्रिक्स वापरले जातात. या दिसतातही खूप छान.

फोटोग्राफी शिकल्यानंतर तुम्ही एखादा वर्तमानपत्रात काम करू शकता. इथे तुम्हाला प्रशिक्षणही दिलं जातं. सुरूवातीला वरिष्ठ फोटोग्राफरच्या मार्गदर्शनाखाली काम करता येईल.

✻ या क्षेत्रात करिअर करण्याआधी स्वतःची वेबसाईट तयार करा. या साईटवर तुम्ही फोटो पोस्ट करू शकता. तुमचे फोटो सोशल साईटवरही अपलोड करता येतील.

✻ वेबसाईट तयार केल्यानंतर सातत्याने फोटो अपलोड करत रहा. फोटो स्टोरी तयार करा. शब्दांशी खेळा. लेखनकौशल्यं वाढवा.

✻ या क्षेत्रात प्रचंड मेहनत करावी लागते. बाहेर फिरावं लागतं. त्यामुळे याची तयारी ठेवा.

# आयआयटी मुंबईचे दोन नवे अभ्यासक्रम

वेगळ्या वाटा




'इंडियन इन्स्टिट्यूट'... 'आयआयटी बॉम्बे'ने 'सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट' आणि 'सायबर सिक्युरिटी' हे दोन प्रोफेशनल सर्टिफिकेट प्रोग्राम सुरू केले आहेत.

हे प्रोग्राम ट्रस्ट लॅब, 'आयआयटी बॉम्बे' द्वारे ऑफर केले जात आहेत आणि विशेषतः कार्यरत व्यावसायिक, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेले आहेत. या प्रोग्राम्सचा फोकस उद्योगाच्या गरजा आणि व्यावहारिक कौशल्यांवर आहे. या दोन्ही प्रोग्राम्ससाठी नोंदणी २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत केली जाईल.

**सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्स:**

हा प्रोग्राम केवळ थियरीवरच नाही तर वास्तविक जगातील कौशल्यांवरदेखील भर देतो. यासाठी दर आठवड्याला लॅब-आधारित प्रयोग केले जातील. या प्रोग्राममध्ये सहभागी होणाऱ्या लोकांना प्रथम UNIX, HTML, CSS आणि JavaScript सारख्या मूलभूत गोष्टी शिकवल्या जातील. त्यानंतर ते PHP, MERN (MongoDB, Express.js, React, Node.js) आणि React with Django वापरून फुल-स्टॅक डेव्हलपमेंट शिकतील. या कोर्समध्ये क्लाउड डिप्लॉयमेंटसाठी चाचणी पद्धती आणि CI/CD पाइपलाइन देखील समाविष्ट आहेत. भविष्यात, क्लाउड कॉम्प्युटिंग, सिस्टम प्रोग्रामिंग आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंगसारखे विषयदेखील त्यात जोडले जातील. या प्रोग्राममध्ये व्यावसायिक प्रमाणपत्र मिळविण्यासाठी, दोन वर्षांत किमान तीन अभ्यासक्रम पूर्ण करावे लागतील. प्रत्येक कोर्सचे स्वतःचे पात्रता आणि मूल्यांकन नियम आहेत. यामध्ये निवड शैक्षणिक ट्रान्सक्रिप्ट, उद्देशाचे विधान (SOP) आणि शिफारसीवर आधारित असेल.

**सायबर सुरक्षा**

'रिअल वर्ल्ड क्रिप्टोग्राफी'चा अभ्यासक्रम १ सप्टेंबर २०२५ पासून सुरू होईल. त्यात एन्क्रिप्शन, डिजिटल सिग्नेचर, सुरक्षित की एक्सचेंज आणि बरेच काही शिकवले जाईल. नेटवर्क सुरक्षेचा अभ्यासक्रम २ जानेवारी २०२६ पासून सुरू होईल. त्याचे लक्ष प्रमुख इंटरनेट प्रोटोकॉल लेयर अटॅक आणि आधुनिक नेटवर्क संरक्षण धोरणांवर असेल. प्रत्येक अभ्यासक्रम १२-१४ आठवड्यांसाठी ऑनलाइन असेल. त्यात पूर्व-रेकॉर्ड केलेली व्याख्याने, टीए (शिक्षण सहाय्यक) द्वारे सहाय्यित प्रयोगशाळा आणि आठवड्याच्या शेवटी लाइव्ह ट्यूटोरियल समाविष्ट असतील. विद्यार्थी वर्गांतदेखील उपस्थित राहू शकतात आणि इच्छित असल्यास कॅम्पस ॲक्टिव्हिटीजमध्ये सहभागी होऊ शकतात.

**पात्रता**

अभियांत्रिकी किंवा संगणक शास्त्रात ३ किंवा ४ वर्षांची पदवी असलेले उद्योग व्यावसायिक पदवीधर तृतीय किंवा चौथी वर्ष आणि पदव्युत्तर विद्यार्थी अर्ज करू शकतात. संबंधित विषयांचे प्राध्यापकदेखील अर्ज करू शकतात.

**फी किती आहे?**

कोअर सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट कोर्सची फी १९,००० ते ३६,००० रुपयांपर्यंत आहे, तर सायबर सिक्युरिटी मॉड्यूलची फी ३६,००० ते ७२,००० रुपयांपर्यंत आहे. प्रत्येक कोर्ससाठी विद्यार्थ्यांना स्वतंत्रपणे पैसे द्यावे लागतील आणि प्रत्येक कोर्स पूर्ण केल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र मिळेल. दोन वर्षांच्या आत आवश्यक असलेले तिन्ही कोर्स पूर्ण केल्यावर व्यावसायिक प्रमाणपत्र दिले जाईल.

# सहा राज्य नवीन रेल्वे मार्गांनी जोडले जाणार

## नागपूर-इटारसी चौथी रेल्वे लाईन आणि संभाजीनगर-परभणी दुसरी रेल्वे लाईनला मंजुरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळ समितीने आज रेल्वे मंत्रालयाचे ११,१६९ कोटी रुपयांच्या खर्चाचे चार प्रकल्प मंजूर केले. विशेष म्हणजे, यातील दोन प्रकल्प महाराष्ट्रात असून, त्यातील एक नागपूर-इटारसी चौथ्या रेल्वेलाइनचा आणि दुसरा संभाजीनगर परभणी दुसऱ्या लाइनचा आहे. या चार प्रकल्पामुळे रेल्वेच्या सध्याच्या नेटवर्कमध्ये ५७४ किलोमीटरचा वाढ होणार आहे. या बहुट्रॅकिंग प्रकल्पामुळे महाराष्ट्र, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, ओडिशा आणि झारखंड अशा सहा राज्यांतील १३ जिल्ह्यांमध्ये रेल्वे कनेक्टिव्हिटीत वाढ होणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅनअंतर्गत नियोजन करण्यात आलेल्या या प्रकल्पांमुळे नमूद राज्यातील २,३०९ गावांतील ४३.६० लाख लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होणार आहे. प्रवासी आणि माल वाहतुकीच्या दृष्टीने येणारे अडथळे दूर होणार असून, सुलभ, जलद आणि विश्वासार्ह सेवा मिळण्यासही त्यांची मदत होणार आहे.

भारतीय जनता पार्टी नागपूर महानगरचे अध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी संपूर्ण नागपूरकरांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून नागपूर ते इटारसी चौथ्या रेल्वे लाईनसाठी मंजूर करण्यात आलेल्या ५,४५१ कोटींच्या निधीसाठी आभार व्यक्त केले आहेत. तिवारी यांनी पत्रात नमूद केले आहे की, या प्रकल्पामुळे प्रवाशांना अधिक सोयी मिळतील, वेळेची बचत होईल आणि मालवाहतुकीसही गती मिळेल. यामुळे देशाच्या आर्थिक मजबुतीसही चालना मिळेल.

भाजपा नागपूर महानगर आणि नागपूर शहरवासीयांच्या वतीने तिवारी यांनी पंतप्रधानांसह संपूर्ण मंत्रिमंडळाचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. तसेच भविष्यातही मोदींच्या नेतृत्वाखाली नागपूरला अशीच मान्यता आणि विकास मिळत राहील, अशी आशा व्यक्त केली आहे. या पत्राची प्रत रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चौहान यांना पाठवून त्यांचेही आभार व्यक्त करण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅनअंतर्गत नियोजन करण्यात आलेल्या या प्रकल्पांमुळे नमूद राज्यातील २,३०९ गावांतील ४३.६० लाख लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होणार आहे. प्रवासी आणि माल वाहतुकीच्या दृष्टीने येणारे अडथळे दूर होणार असून, सुलभ, जलद आणि विश्वासार्ह सेवा मिळण्यासही त्यांची मदत होणार आहे.

इटारसी-नागपूर फोर्थ लाइन आणि औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)-परभणी सेकंड लाइनमुळे एकीकडे रेल्वेची प्रवासी तसेच मालवाहतूक सुसाट होणार असून, विदर्भ, मराठवाडा आणि मध्य प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे. त्या-त्या भागातील व्यापार तसेच स्थानिक उद्योगांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे. आत्मनिर्भर भारत संकल्पनेच्या दिशेने एक ठोस पाऊल पडण्याचेही संकेत या प्रकल्पामुळे आहे.

# एका मुलीवर दोघांचा जीव जडला
# युवकाचा बळी गेला



■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ४ :

संपूर्ण शहराला सुन्न करणाऱ्या सनी जाधव हत्या प्रकरणात प्रमुख आरोपी देवराज संतोष माळी यांस अटक करण्यात पोलिसांना यश मिळाले. खून करून फरार झालेल्या आरोपींना काही तासांतच शहर पोलिसांनी पकडले. एकुण चार आरोपी अटकेत असून या आरोपींना न्यायालयाने चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. प्रेमप्रकरणातून सनी सुरेश जाधव या १९ वर्षीय तरूणाचा बळी गेला. एकाच मुलीवर दोघांच्या प्रेमप्रकरणातून सदर प्रकार घडल्याचे पोलिसांना प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे.

यासंदर्भात ठाणेदार रवि राठोड यांनीही खूनाला प्रेमप्रकरणाची किनार असल्याचे सांगितले चिखली रोडवर ड्रिम कॉस्मेटिक दुकानाच्या बाजूला एका निर्माणाधीन ईमारतीच्या ठिकाणी सनीवर चाकूने हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात देवराज माळीसह इतर चार ते पाच जणांनी सनीला संपविले.

सनीच्या पोटात, डाव्या बाजूला नाभी जवळ व बरगडीच्या खाली चाकूने भोसकून त्याचा खून करण्यात आला. यात देवराज संतोष माळी (वय १९, रा. भिलवाडा बुलढाणा) सह ऋषी गायकवाड याचेही नांव समोर आले आहे. पोलिसांनी एकूण चार आरोपींना खूनप्रकरणी अटक केली आहे. सनीचे मजूर वडील सुरेश भाऊराव जाधव (वय ५० रा. गौतमनगर बुलढाणा) यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), ३ (५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चारही आरोपींना आज न्यायालयासमोर उपस्थित करण्यात आले होते. न्यायालयाने आरोपींना चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. सनी जाधव खून प्रकरणात आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. केवळ ४ आरोपी नाहीत तर मारहाण करणाऱ्यांमध्ये आणखीही काही नांवे असल्याचे पोलिस सुत्रांचे म्हणणे आहे.

# कारच्या बोनेटमध्ये निघाला अजगर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :



पावसाळ्यात पाणी जमिनीत झिरपत असल्याने बिळातून साप बाहेर पडण्याचे प्रमाण वाढत आहे. आठ दिवसांपूर्वी शहरातील एका बँकेत अजगर निघाला. तर आता कारच्या बोनेट मध्ये चक्क अजगराचे पिल्लू निघाले.सर्पमित्रांनी मात्र शिताफीने अजगराचे रेस्क्यू करुन कारमालकाला सुरक्षित केले. तर त्याचवेळी अजगराच्या पिल्लाला देखील नैसर्गिक अधिवासात सुरक्षित सोडले.

अमरावती मार्गावरील सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड येथे रमेश वझलवार यांना त्यांच्या कारच्या बोनेटमधून साप बाहेर डोकावताना दिसला. त्यामुळे ते घाबरले, पण त्याचवेळी कोणताही धोका न पत्करता त्यांनी ताबडतोब स्थानिक सर्पमित्र हर्षल शेंडे यांच्याशी संपर्क साधला व त्यांना मदतीसाठी बोलावले. हर्षल शेंडे यांनी जराही वेळ न दवडता घटनास्थळ गाठले व परिस्थितीचा आढावा घेतला. यावेळी तो साप नाही तर ते अजगराचे पिल्लू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. कारचे बोनेट उघडताच अजगराचे पिल्लू गुंडाळलेल्या स्थितीत त्यांना दिसून आले. त्यांनी अतिशय सुरक्षितपणे त्याला पकडले आणि नैसर्गिक अधिवासात मुक्त केले.

हर्षल शेंडे यांनी अतिशय सुरक्षितरित्या अजगराचे पिल्लू बाहेर काढल्याने कारमालकांनी देखील सुटकेचा श्वास सोडला. आठ दिवसांपूर्वी शहरातील मनिषनगर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया येथे सुमारे अडीच फूट लांबीचा साप आढळला. बँकेचे कर्मचारी सकाळी बँकेत गेले असताना त्यांना कॅबिनमध्ये अडीच फुट लांबीचा साप दिसला. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली होती. त्यावेळी देखील हेल्प फॉर ॲनिमल वेलफेअर असोसिएशनच्या सर्पमित्रांनी सुरक्षितपणे सापाला पकडून नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. तर या घटनेच्या काही दिवसांपूर्वी वर्धा रोडवर चिचभवन येथील भवन्स स्कूलसमोर रस्त्यावर पाच फूट लांबीचा अजगर आढळला होता. सध्या पावसाने विश्रांती घेतली असली तरीही बिळातून साप, अजगर बाहेर निघण्याचे प्रमाण वाढत आहे नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन सर्पमित्रांनी केले आहे.

# नगरसेवक राजेंद्र अडपेवार यांचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ४ :



भाजपचे चंद्रपूर महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार यांनी महानगराची कार्यकारिणी जाहीर करताच भाजप निष्ठावंतांच्या राजीनामा सत्राला सुरूवात झाली आहे. माजी नगरसेवक राजेंद्र अडपेवार यांनी शहर उपाध्यक्ष पदाचा तत्काळ प्रभावाने राजीनामा दिला आहे. हा राजीनामा देतांना, सातत्याने पक्ष बदल करणाऱ्या दलबदलुंची व उपऱ्यांची कार्यकारिणीत महत्वाच्या पदावर नियुक्ती करणे आणि ३० ते ३५ वर्षापासून पक्षाचे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या निष्ठावंतांवर अन्याय व अवहेलना होत असल्याची बाब महानगर भाजपची नविन कार्यकारिणी बघितली तर दिसून येते. हा निष्ठावंतांवर एक प्रकारे अन्याय आहे, असा थेट आरोप अडपेवार यांनी केला आहे.

भाजपाचे चंद्रपूर शहर महानगर अध्यक्ष सुभाष कोसनगोट्टूवार यांनी रविवार ३ ऑगस्ट रोजी चंद्रपूर महानगर भाजपाची कार्यकारिणी जाहीर केली. शिवसेनेतून भाजपवासी झालेल्यांना आणि विधानसभा निवडणुकीत केवळ उमेदवारीसाठी काँग्रेसच्या मंचावर जावून पून्हा भाजपात दाखल झालेल्यांची महत्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

# ते वक्तव्य नौटकीबाज आंदोलन करणाऱ्याबाबत : चंद्रशेखर बावनकुळे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ४ :



अनके पश्चिम महाराष्ट्राचे नेते नोटंकी करीत आहे हे माझे वक्तव्य ते बच्चू कडूसाठी नव्हते तर महाराष्ट्रात होत असलेल्या नोटंकीबाज आंदोलन करणाऱ्याबाबत होते, असा खुलासा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. ते नागपुरात माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते. अमरावती मध्ये भाषण करताना बच्चू कडू यांच नाव घेतले नाही, उलट बच्चू कडू यांनी सांगितलेल्या बैठका आम्ही घेतल्या, दिव्यांग बांधवांचे महिन्याचे मानधन वाढवले आहे. रोज अनेक नौटंकी आंदोलन सुरू आहे.परवा दांडी यात्रा निघाली असल्याचे सांगून राज्यात असे आंदोलन सुरू आहे. त्यावर मी बोललो. गरीब माणसाचे कर्ज माफ झाले पाहिजे, त्यासाठी समिती गठीत केली आहे, आठ दिवसानंतर त्यासंदर्भात बैठक घेणार आहे असेही बावनकुळे

नागपूर येथे झालेल्या दोन दिवसीय महसूल परिषदेमध्ये अधिकाऱ्यांनी जवळपास साडेतीनशे सुधारणा सुचविल्या आहेत. या सुधारणा लागू केल्यानंतर महाराष्ट्रातील महसूल विभाग देशात क्रमांक एकचा विभाग होणार असल्याचे मत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. उद्या जरी स्थानिक स्वराज्य निवडणूक झाल्यास भाजप तयार आहे. प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली बूथपर्यंत आमचे संघटन झाले आहे. सर्व जिल्ह्याच्या कार्यकारिणी पूर्ण झाल्या आहेत. धाराशिव, बुलढाणा या भागात मी जाणार आहे, विधानसभामध्ये ५१.७८ टक्के मत घेऊन आम्ही जिंकलो होतों आता साठनिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत आम्ही जिंकणार असल्याचा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला.

: हॅलो डॉक्टर :

# भारतीय पुरुषामधील फुफ्फुसाचा कर्करोग दुसऱ्या क्रमांकावर




कोणत्याही प्रकारचा कर्करोग हा आजार म्हणजे जीवघेणा आजारच आहे. तोंडाचा कर्करोग, अंडकोशाचा कर्करोग, रक्ताचा, यकृताचा किंवा स्त्रियामध्ये प्रामुख्याने आढळणारा स्तनाचा कर्करोग असे कर्करोगाचे अनेक प्रकार असले तरी अलीकडे वैद्यकीय संशोधनाअंती भारतीय पुरुषांमध्ये फुफ्फुसाच्या कर्करोगाचे प्रमाण हे जगभरात दुसऱ्या क्रमांकावर घातक असल्याचे सिध्द झालेले आहे. अती धुम्रपान, मद्यपान, तंबाखूचे सेवन अशा अनेक कारणा बरोबरच वाढते प्रदूषण हे देखील पफुफुसाच्या कर्करोगाचे एक प्रमुख कारण बनले आहे. याच अनुषंगाने अलिकडेच संपन्न झालेल्या जागतिक फ्फुफुसाचा कर्करोग दिना निमित्त केअर हॉस्पिटलचे कर्करोगतज्ञ डॉ. दीपक यांच्याशी केलेली बातचीत.

**पुरुषांमधील फुफुसाच्या कर्करोगा संदर्भात भारताची सद्यस्थिती काय आहे?**

जागतिक फुफ्फुसांचा कर्करोग दिनानिमित्त, केअर हॉस्पिटल्स फुफ्फुसांच्या कर्करोगामुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी लवकर तपासणी आणि वेळेवर हस्तक्षेप करण्याच्या महत्त्वावर जागरूकता वाढवत आहे. भारतात रुग्णांची संख्या सातत्याने वाढत असताना, डॉक्टरांनी इशारा दिला आहे की सक्रिय निदान आता पूर्वीपेक्षा जास्त महत्वाचे आहे.

फुफ्फुसांचा कर्करोग हा भारतात आणि जगभरातील सर्वात धोकादायक आणि वेगाने वाढणाऱ्या कर्करोगांपैकी एक आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, दरवर्षी जागतिक स्तरावर १.८ दशलक्षाहून अधिक मृत्यू होतात, ज्यामुळे ते जगभरात कर्करोगाशी संबंधित मृत्यूंचे प्रमुख कारण बनले आहे.भारतात, फुफ्फुसांचा कर्करोग आता पुरुषांमध्ये कर्करोगाच्या मृत्यूंचे दुसरे सर्वात सामान्य कारण आहे, दरवर्षी प्रकरणांमध्ये तीव्र वाढ होत आहे. अभ्यासानुसार, दर एक लाख लोकसंख्येमागे सुमारे २८ लोक फुफ्फुसाच्या कर्करोगाने ग्रस्त आहेत, आणि नवीन रुग्णांमध्ये दरवर्षी १५-२०% वाढ होत आहे.

**फुफुसाच्या कर्करोगाच्या वाढत्या प्रमाणाची कारण काय आहेत?**

तज्ञांचे म्हणणे आहे की तंबाखूचा वापर, वायू प्रदूषण, अनुवांशिक घटक आणि जीवनशैलीच्या सवयी यांच्या संयोजनामुळे भारत लवकरच फुफ्फुसाच्या कर्करोगाच्या बाबतीत अव्वल देशांमध्ये स्थान मिळवू शकतो.

जवळजवळ ३०% भारतीय प्रौढ पुरुष धूम्रपान करतात आणि बरेच जण निष्क्रिय धूम्रपान किंवा प्रदूषित वातावरणाच्या संपर्कात येतात. हा आजार पुरुष आणि महिला दोघांनाही होतो, परंतु तो पुरुषांमध्ये, विशेषतः ४० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या धूम्रपान किंवा औद्योगिक संपकार्चा इतिहास असलेल्यांमध्ये अधिक प्रमाणात आढळतो.

**फुफुसाच्या कर्करोगावर आधुनिक उपचार पद्धती काय आहे?**

कर्करोग आता पूर्वीसारखा मृत्युदंड नाही. लक्ष्यित केमोथेरपी, उच्च-परिशुद्धता रेडिएशन आणि एंडोब्रोन्कियल अल्ट्रासाऊंड सारख्या निदान साधनांसारख्या वैद्यकीय प्रगतीमुळे उपचारांमध्ये अचूकता, आराम आणि यशाचे प्रमाण सुधारत आहे. या तंत्रज्ञानामुळे डॉक्टरांना फुफ्फुसे, छाती आणि लिम्फ नोड्समधील ट्यूमर अधिक प्रभावीपणे आणि कमीत कमी अस्वस्थतेसह ओळखता येतात. अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि तज्ञ कर्करोग तज्ञ एकाच छताखाली जागतिक दजार्चे उपचार देत असल्याने, प्रगत कर्करोग आता पूर्ण बरा होऊ शकतो.

**फुफुसाच्या कर्करोगा संदर्भात जनजागरणपर काय संदेश द्याल?**

फुफुसाचा कर्करोग हा अती धुम्रपान,मद्यपान आणि विविध प्रकरचे वायू प्रदूषण यामुळे होतो त्यामुळे धुम्रपान आणि मद्यपान बंद करायला हवे. मोकळ्या हवेत फिरायला हवे. फुफुसाच्या कर्करोगाची कोणतीही लक्षण म्हणजे वारंवार खोकला, चालताना दम लागणे, भूक न लागणे अशी साधारण लक्षण दिसली कि वेळीच निदान करावे आणि त्यानंतर योग्य ती उपचार पद्धती सुरु करावी. फुफुसाचा कर्करोग घातक असला तरी वेळेवर निदान केल्यास तो बरा होऊ शकतो.

■ ■ ■

# कासवाला जीवनदान



श्री नावाच मादी कासव हे गेल्या 1-2 महिन्यांपासून अनेक आरोग्य समस्यांशी संघर्ष करत होती. पुण्यातील स्मॉल ॲरनिमल क्लिनिकने क्रॉनिक एग-बाइंडिंग सिंड्रोम, यकृताचा आकार वाढणे आणि हिमोग्लोबिनची कमतरता असलेल्या मादी कासवावर यशस्वी लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया केली.

ही दुर्मिळ प्रक्रिया नामांकित पशुवैद्यकीय सर्जन डॉ. नरेंद्र परदेशी यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. या शस्त्रक्रियेत चार पूर्णता तयार झालेली अंडी बाहेर काढण्यासह या कासवाला वाचविता आहे. हमी सक्रिय असणारं श्री नावाच मादी कासव गेल्या काही महिन्यांपासून अचानक सुस्त झाले होते, या कासवाने आहाराचे सेवन देखील बंद केले होते. तळेगावजवळील सोमाटणे येथे राहणारे या पाळीव कासवाचे पालक, श्री आणि श्रीमती नामदेव यांना या कासवाच्या अंडी बाहेर पडण्याच्या जागेस सूज आल्याने श्री अस्वस्थ होत असल्याचे दिसून आले. या कासवाला पुण्यातील द स्मॉल अॅ.निमल क्लिनिकमध्ये नेण्यात आले. यावेळी काही चाचण्या करण्यात आल्या आणि तपासणीत दिसून आले की एग बाऊडींगचा ( अंड बाहेर काढू न शकणे) त्रास असल्याचे लक्षात आले.

श्रीची शस्त्रक्रिया २१ जुलै रोजी लॅप्रोस्कोपीक पध्दतीचा वापर करुन केली जाणार होती. शस्त्रक्रिये दरम्यान, गर्भाशयाच्या उजव्या मागच्या पायाजवळील एका लहान छिद्र पाडून अंडाशय (फॅलोपियन ट्यूब ही नळीसारखी रचना आहे जी गर्भाशयापासून अंडाशयापर्यंत पसरते) मध्ये हळूवारपणे प्रवेश केला गेला आणि चार पूर्णपणे तयार झालेली अंडी काढण्यात आली. त्यानंतर, अंडाशय देखील काढून टाकण्यात आले. श्री एका तासातच बरी झाली आणि पूर्णपणे स्वस्थ आहे.

■ ■ ■




# आरोग्यवर्धक हिंग

भारतीय मसाल्यांमध्ये प्रत्येक मसाल्याचा स्वतंत्र असा एक गुणधर्म आहे. त्यातही हिंगाला सर्वाधिक महत्त्व आहे. हा मसाला केवळ सुगंधासाठीच नाही तर त्याच्या औषधी गुणधर्मासाठीही ओळखला जातो. यामुळेच भारतीय स्वयंपाकघरात हिंगाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. ज्यांना पचनाच्या समस्या आहेत त्यांनी हिंगाचा वापर नक्की करावा. यामुळे पोट फुगत नाही, जळजळ होत नाही तसेच अन्नाचे पचन व्यवस्थित होण्यास मदत होते.याशिवाय हृदयाचे आरोग्य आणि डोळ्यांच्या आजारांमध्ये हे खूप फायदेशीर ठरू शकते. याबरोबरच हे ब्लडप्रेशर, लिव्हर फंक्शन, किडनीशी संबंधित समस्या आणि उच्च रक्तदाब यामध्ये खूप फायदेशीर आहे. आपण दररोज आहारात साधारण 250 मिलीग्राम हिंग समाविष्ट करू शकता. ज्या लोकांना रक्तस्त्राव किंवा मज्जासंस्थेचे विकार आहेत त्यांनी हिंग खाणे टाळावे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते,तुम्ही रिकाम्या पोटी कोमट पाण्याबरोबर चिमूटभर हिंग खाऊ शकता.

■ ■ ■

संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# कावड यात्रेत दुचाकी शिरली

■ महासागर प्रतिनिधी,
बुलढाणा, दि. ४ :



एक ठार, चार जखमी

तालुक्यातील पळसखेड व पाडळी या गावा दरम्यान भीषण अपघात झाला. श्रावण सोमवार निमित्त निघालेल्या कावड यात्रेत भरधाव अनियंत्रित दुचाकी (मोटार सायकल) शिरल्याने झालेल्या दुर्देवी अपघातात एक भाविक ठार झाला. चार जखमी झाले.

अजिंठा मार्गावरील पाडळी आणि पळसखेडच्या मध्ये सोमवारी, ४ ऑगस्ट रोजी एका भरधाव मोटरसायकलने कावडधाऱ्यांना उडवले. या भीषण अपघातामध्ये एक जण जागीच ठार तर चार जण जखमी झाले आहेत. मृतकाचे नाव मुकेश गजानन राठोड (वय २५) असून तो गुळभेली येथील रहिवासी आहे. कावड यात्रेतील आणखी दोघेजण गंभीर जखमी झालेले आहेत तर मोटरसायकल वरील दोघांनाही जबर मार लागला आहे.

गुळभेली येथे ग्रामसेवक नागपुरे यांच्या पुढाकारातून नव्यानेच शिवमंदिर बांधण्यात आले आहे. रविवारी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास गुळभेली येथून पहिल्यांदाच बुलढाणा तालुक्यातील बुधनेश्वरला कावड यात्रा निघाली. जवळपास चाळीस पेक्षा अधिक तरुण या कावडयात्रेत सहभागी झाले होते. बुधनेश्वरला पोहोचल्यानंतर रात्री १२ वाजेच्या सुमारास आरती करण्यात आली. त्यानंतर श्रावण सोमवार सुरू झाल्यामुळे कावड यात्रा परतीसाठी रवाना झाली. पळसखेड नागोच्या जवळपास एक भरधाव मोटरसायकल मागून येऊन कावड यात्रेत घुसली. मोटर सायकल (एम एच २८ बी. झेड ५२७४) ने कावडधारी मुकेश राठोडला उडवले. योगेश चव्हाण आणि आणखी एक कावडधारी या धडकेत जखमी झाले.

मोटरसायकल स्वार ऋषिकेश काकडे आणि मनोज माळोदे हे दोघेही जबर जखमी झाले. सर्वांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र मुकेश राठोड याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला होता.

# उड्डाण पुलावरून तरुणाने घेतली उडी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

कोराडी मार्गावरील मानकापूर पुलावरून उडी घेत तरुणाने भर दुपारी आत्महत्या केल्याने एकच खळबळ उडाली. दुपारी दिडच्या सुमारास घडलेल्या या घटनेमुळे वर्दळीचा रस्ता असलेल्या या भागात वाहतूक व्यवस्था खोळंबली.

हा तरुण सावनेरच्या दिशेने उड्डाणपुलावरुन सदरकडे जात होता. पागलखाना चौकाजवळ पोचताच त्याने गाडी उड्डाणपुलावरच थांबवली. त्यानंतर अवघ्या काही सेकंदात तो पुलाच्या कठड्यावर चढला. भर दुपारी दिडच्या सुमारास हा तरुण पुलावरून उडी मारत असताना अनेकांनी पाहिले. काही जणांनी ओरडून त्याला उडी मारू नको, असेही दरडावले. मात्र त्याने काही क्षणातच उडी घेतली. पुलाच्या खालूनही मोठया प्रमाणात त्यावेळी वाहतूक सुरू होती. भर दुपारी तरुणाने पुलावरून उडी घेतल्याने परिसरात खळबळ उडाली. काही जणांनी त्याला उचलण्याचा प्रयत्न केला. मात्र तोवर त्याचा प्राण गेला होता. कोणीतरी मानकापूर पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांचे फिरतीवर असलेले पथक काही वेळातच घटनास्थळी पोचले. तरुणाच्या आत्महत्येचे नेमके कारण मात्र अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# महसूल मंत्री बावनकुळेंच्या प्रतिमेला जोडे मारले

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आंदोलनाला नौटंकी म्हटल्याचा निषेध

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ४ :



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल मोर्शी येथील एका कार्यक्रमात बोलताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफी आंदोलनाला नौटंकी म्हटल्याच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती पक्षाच्या कार्यकर्त्यांनी महसूल मंत्र्याच्या प्रतिमेला जोडे मारून संताप व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांनी मिरच्या देखील जाळल्या.

शेतकऱ्यांच्या वेदनेला नौटंकी म्हणणं म्हणजे कष्टकरी शेतकऱ्यांच्या भावनांचा अनादर करणे आहे, हे सरकार शेतकरी विरोधी धोरण राबवत असल्याचे बावनकुळे वक्तव्यावरून स्पष्ट होत आहे. राजकारण्यांनी जर या वेदनेचा अपमान केला, तर त्या अपमानाचे उत्तर जनतेच्या रोषातून मिळेल. जो शेतकऱ्याचा अपमान करेल, तो जनतेच्या रोषाला सामोरे जाईल, असा इशारा प्रहारच्या कार्यकर्त्यांनी दिला.

चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोर्शी येथे बोलताना काही लोक शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर नौटंकी करीत आहेत, असे वक्तव्य केले होते. त्यांनी थेट माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांचे नाव घेतले नाही, पण प्रहारच्या कार्यकर्त्यांनी या वक्तव्यावर आक्षेप घेतला. शेतकऱ्यांचा प्रश्न सर्वसामान्य लोकांचा प्रश्न आहे, पण भाजप सरकारने तो नौटंकी आणि टिंगल टवाळी म्हणून दडपण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. निवडणुकीपूर्वी सातबारा कोरा,कोरा, कोरा म्हणणारे आज शेतकऱ्यांकडून कर्जमाफीची तारीख विचारली की त्यांना मिरची झोंबते, आणि त्यांच्या आंदोलनाला अपमानित केल्या जाते, असे प्रहारच्या कार्यकर्त्यांचे म्हणणे होते.

प्रहारच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी त्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोड़े मारो आंदोलन केले आणि मिरच्या जाळल्या. या आंदोलनाद्वारे शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्यांचा संताप व्यक्त झाला असून खिल्ली उडवणारे आणि फसवणूक करणाऱ्यांचा निषेध करण्यात आला. बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी आंदोलन आता जिल्हानिहाय आणि अधिक तीव्र होत आहे. ही लढाई फक्त कर्जमाफीची नाही, ती शेतकऱ्याच्या अस्मितेची लढाई आहे, असे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

या आंदोलनाच्या वेळी प्रहार जनशक्ती पक्षाचे जितू दुधाने, महानगर प्रमुख बंटी रामटेके, प्रदेश सचिव नंदकिशोर कुयटे, संपर्क प्रमुख गोलू पाटील, अकबर भाई, अर्जुन अवशिकर, मनीष पवार, राजू परिसे, समर्थ डावरे, आणि महिला नेत्या मंजुषा बोडखे, अलका शहाणे, शुभांगी वाटाणे, पद्मा मेतकर, ललिता धूर्वे आदी उपस्थित होते. शेतकऱ्यांना खोट्या आश्वासनांनी फसवणे थांबवा. सातबारा कोरा कोरा कोरा या घोषणेचा विसर पडलेल्या बावनकुळे यांना जबाबदार ठरवून मंत्रिमंडळातून हटवा, कर्जमाफी आणि हमीभावावर तात्काळ आणि स्पष्ट तारीख जाहीर करा, अशी मागणी प्रहाच्या कार्यकर्त्यांनी केली.